।। शीलं परम् भूषणम् ।।

राष्ट्रीय शिक्षण संस्था लाखनी द्वारा संचालित

(हीरक महोत्सवी वर्ष : २०२४-२५)

# समर्थ महाविद्यालय, लाखनी

जि. भंडारा-४४१८०४

## कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

(कनिष्ठ, पदवी व पदव्युत्तर)

**NAAC RE-ACCREDITED 'B' GRADE**

Visit us on our website : www.samarthcollege.in


Email ID : smvlakahani@yahoo.in



राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे संस्थापक
शिक्षण महर्षी
स्व.बापूसाहेब उपाख्य परशुराम गोविंदबापू लाखनीकर

# माहिती पुस्तिका

# २०२५-२०२६



# आमचे प्रेरणास्थान



शिक्षण महर्षी

## स्व.बापूसाहेब उपाख्य परशुराम गोविंदबापू लाखनीकर

संस्थापक,राष्ट्रीय शिक्षण संस्था, लाखनी





मा.आल्हादजी लाखनीकर
अध्यक्ष
राष्ट्रीय शिक्षण संस्था, लाखनी

डॉ.दिगांबर द.कापसे
प्राचार्य
समर्थ महाविद्यालय, लाखनी

## महाविद्यालयाचे ध्येय व उदिष्टे

राष्ट्रीय शिक्षण संस्था ही सन १९४२ साली राष्ट्रीय दृष्टीकोन समोर ठेवून स्थापन झाली व १९६४ साली समर्थ महाविद्यालय लाखनीची सुरूवात करण्यात आली. सदैव राष्ट्रकल्याणाचे भान राहावे या भूमिकेतून, 'परं वैभवं नेतुमेतत्स्वराष्ट्रम' हे संस्थेचे ध्येय वाक्य, संस्थेचे संस्थापक व त्यांच्या सहकारी मंडळीनी आपल्या दृष्टीसमोर ठेवले आहे.

'परं वैभवं नेतुमेतत्स्वराष्ट्रम' म्हणजेच आम्हाला आमच्या राष्ट्राला परमवैभवाप्रत न्यायचे आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी आम्ही आमच्या समोर उद्दिष्टे ठेवली आहेत.

### OUR MISSION

**परं वैभवं नेतुमेतत्स्वराष्ट्रम**

It means we have to take up our nation at the glorious height.
For this we have stepped to provide higher education in rural area.

### OUR VISION

**शीलं परं भूषणम्**

It means character is real ornament for all sided development of the student.

## महाविद्यालयाची ओळख

- स्थापना वर्ष १९६४
- नॅक संस्था बंगलोर द्वारा राष्ट्रीय स्तरावर पुर्नमूल्यांकन झालेले लाखनी परिसरातील महाविद्यालय. (नॅक द्वारा प्राप्त श्रेणी 'B')
- कला व वाणिज्य शाखेत पदव्युत्तर शिक्षणाची सोय
- पदवी व पदव्युत्तर स्तरावर गुणवत्ताधारक (मेरीट) विद्यार्थ्यांची उज्वल परंपरा.
- विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी व व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा यासाठी वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन. म्हणून महाविद्यालयात L.C.D.
- प्रोजेक्टरची सोय आहे.
- १०० विद्यार्थीनींची निवासाची व्यवस्था होईल असे भव्य वसतीगृह. (२०११–१२ पासून उपलब्ध आहे.)
- ५३हजारपेक्षाही अधिक ग्रंथ असलेले महाविद्यालयाचे भव्य व समृद्ध वाचनालय.
- अद्ययावत संगणक प्रयोग शाळा.
- विज्ञान शाखेत बॉयोटेक्नॉलाजी विषयाची भंडारा जिल्हयातील एकमात्र सुविधा.
- विज्ञान शाखेची नवनिर्मित अद्ययावत प्रयोग शाळा.
- एन.सी.सी. चे १०८ विद्यार्थ्यांचे युनिट असलेले लाखनी तालुक्यातील एकमात्र महाविद्यालय.
- ८ पीएच. डी. प्राप्त प्राध्यापक, नेट–सेट गुणवत्ताधारक प्राध्यापक.
- पदवी शिक्षण घेत असतांना अल्पकालीन व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण घेण्याची सोय.
- यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे मान्यताप्राप्त केंद्र.
- आजपर्यंत महाविद्यालयाचे ६गुणवत्ताप्राप्त प्राध्यापक नागपूर विद्यापीठाशी संलग्नित विविध महाविद्यालयाच्या प्राचार्य पदावर दाखल.
- इंग्रजी संभाषण वर्गाद्वारे विद्यार्थ्यांना इंग्रजी संभाषण कला शिकविण्याची सोय.
- संस्कृत विषय असलेले भंडारा जिल्ह्यातील एकमेव महाविद्यालय.
- अद्ययावत जीम् (व्यायाम शाळा)
- उपहार गृहाची उत्तम व्यवस्था.
- शिक्षण घेत असतांनाच संगणकाचे अल्पकालीन अभ्यासक्रम पूर्ण करण्याची सोय.
- स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन वर्गाची सोय.
- सत्र २०२४–२५ हीरक महोत्सवी वर्ष थाटामाटात साजरा केला.

## महाविद्यालय विशेष

ग्रामीण क्षेत्रातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय व्हावी म्हणून हे महाविद्यालय सन १९६४ साली सुरू करण्यात आले. तेव्हापासून महाविद्यालय हे सतत प्रगतीपथावर असून आमच्या महाविद्यालयाचे राष्ट्रीय स्तरावर बॅक संस्था बंगलोर द्वारे मूल्यांकन करण्यात आले आहे. महाविद्यालयातील विविध सुविधांमध्ये वाढ व्हावी. तसेच विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी यादृष्टीने आमचे महाविद्यालय सतत प्रयत्नशील आहे.

महाविद्यालयात सध्या कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदवी व कला आणि वाणिज्य शाखेत 'पदव्युत्तर' शिक्षणाची सोय उपलब्ध असून कला शाखेत पूर्णकालीन व अंशकालीन प्राध्यापक कार्यरत आहेत. तसेच मराठी विभागात एक प्राध्यापक, इतिहास विभागात एक, ग्रंथालय विभागात एक व इंग्रजी विभागात एक, वाणिज्य विभागात तीन, असे एकूण त्त डॉक्टरेट पदवी प्राप्त प्राध्यापक आहेत. तसेच यापैकी दोन प्राध्यापक हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने मान्यता दिलेले पीएच. डी. पदवीचे मार्गदर्शक (Guide) आहेत. महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ व सुंदर राहावा या दृष्टीने वृक्ष लागवड करण्यात आली असून बगीचा निर्माण करण्यात आला आहे. याशिवाय विद्यार्थ्याच्या – व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने महाविद्यालयात सांस्कृतिक, शैक्षणिक, स्वास्थविषयक, सामाजिक, राष्ट्रीय व प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविण्यात येतात.

### व्यवसायाभिमुख अभ्यासकम "कमवा व शिका"

आमच्या महाविद्यालयाचा विद्यार्थी केवळ पदवीधर न राहता महाविद्यालयातून पदवी घेवून बाहेर पडल्यावर त्याला स्वत:च्या पायावर उभे राहता यावे व अर्थाजन करता यावे यासाठी पदवीपर्यंतचे शिक्षण घेत असतांना स्वयंरोजगार करता यावा यासाठी व्यवसायाचे मार्गदर्शन व प्रशिक्षण मिळावे या उद्देशाने आमच्या महाविद्यालयातर्फे २००७–०८ या शैक्षणिक सत्रापासून "कमवा व शिका" उपक्रम सुरु आहे.

सूचना :– हया अभ्यासक्रमाच्या अधिक माहितीसाठी वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुनंदा देशपांडे (रामटेके) हयांच्याशी संपर्क साधावा.

## कमवा व शिका उपक्रमांतर्गत परिश्रमीकाचे मानधन स्विकारताना विद्यार्थी



# गुणगौरव सोहळा



मा.केंद्रीय मंत्री पियुष गोयल व मा.खासदार प्रफुल पटेल यांच्या हस्ते सत्कार स्विकारताना महाविद्यालयाच्या बी.कॉम विभागातील विद्यार्थीनी मोनिका गायधने



**हीरक महोत्सवी गुणगौरव सोहळा सत्रः२०२४-२५**

मानव्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.श्याम कोरेटी, आंतरविद्या शास्त्रीय विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.प्रशांत कडू, बेरार फायनान्स लि.चे संस्थापक श्री.मारोती जवंजार, मा.आल्हादजी लाखनीकर,अध्यक्ष रा.शि.संस्था लाखनी यांच्या उपस्थितीत संपन्न

### रॅगिंग विरोध समिती

१. डॉ.दिगांबर कापसे (प्राचार्य) — अध्यक्ष
२. डॉ.सुनंदा देशपांडे — प्रमुख
३. डॉ.धनंजय गभणे — सदस्य
४. प्रा.धनंजय गिन्हेपुंजे — सदस्य
५. डॉ.भाष्कर पर्वते — सदस्य

### विद्यार्थी तकार निवारण समिती

१. डॉ.दिगांबर कापसे (प्राचार्य) — अध्यक्ष
२. डॉ.सुरेश बन्सपाल — प्रमुख
३. डॉ.धनंजय गभणे — सहप्रमुख
४. डॉ. संगिता हाडगे — सदस्य

### महिला तक्रार निवारण समिती

१. डॉ.दिगांबर कापसे (प्राचार्य) — अध्यक्ष
२. डॉ.संगिता हाडगे — कार्यवाह
३. डॉ.सुनंदा देशपांडे — — सदस्य
४. प्रा.धनंजय गिन्हेपुंजे — सदस्य
५. कु.मनिषा मदनकर — सदस्य
६. श्री.मंगेश शिवरकर — सदस्य
७. श्रीमती मालन सरोते — सदस्य

### :: परीक्षा ऑन लाईन फार्म बाबत विशेष महत्त्वाची सूचना ::

१.विद्यार्थ्यांनी विद्यापीठ परीक्षेचे फार्मस ऑन लाईन भरून त्याची हार्ड कॉपी, विद्यापीठ परीक्षा शुल्कासह महाविद्यालयात जमा करावयाची असते. अनेक विद्यार्थी शुल्क जमा करतात. पण हार्ड कॉपी महाविद्यालयात आणून देत नाहीत. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांना परीक्षेपासून वंचित राहावे लागू शकते. सबब आपण शुल्क भरल्यानंतर आपला कोणत्या परीक्षेचा फार्म कोणत्या दिनांकाला ऑन लाईन भरला व त्याची हार्ड कॉपी आपण कोणत्या दिनांकाला महाविद्यालयात जमा केली याची पोच पावती घ्यावी. अन्यथा आपल्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

२. सोबतच ABC ID प्रवेशाच्यावेळी तयार करुन प्रवेश फॉर्म सोबत जोडावी व परीक्षा फॉर्म सोबतही जोडावी.

प्राचार्य — समर्थ महाविद्यालय, लाखनी

### :: महत्त्वाच्या सूचना ::

१) महाविद्यालयात प्रवेश घेताना सादर केलेले शाळा किंवा महाविद्यालय सोडण्याचे मूळ प्रमाणपत्र (Original Leaving Certificate) परत केले जाणार नाही.

२) प्रवेश घेतांना मूळ गुणपत्रिका. (Original Marklist) व तिच्या दोन सत्यप्रती जोडयाव्यात.

३)संस्था प्रमुखाकडून प्राप्त करून घेतलेले चारित्र प्रमाणपत्र. (Original Character Certificate) (हे प्रमाणपत्र परत केले जाणार नाही.)

४) शिवाय वरील १,२ मधील प्रमाणपत्राच्या सत्यप्रतिलिपी (अधिकृत व्यक्तीनी सत्यापित केलेल्या प्रत्येक दोन प्रती.) त्याच बरोबर विद्यार्थ्यांनी आपल्याजवळ आवश्यक तेवढ्या सत्यप्रती काढून ठेवाव्यात. प्रवेश दिल्यानंतर सत्यप्रती करण्यासाठी महाविद्यालयातून मूळ कागदपत्रे मिळणार नाही.

५) महाराष्ट्र स्टेट बोर्ड अथवा नागपूर विद्यापीठ या व्यतिरिक्त इतर बोर्ड किंवा विद्यापीठातून येणाऱ्या विद्यार्थ्यांनी मूळ अंतर्वजन प्रमाणपत्र (Original Immigration Certificate) जोडावे. हे पत्र कार्यालयात दाखल करे पर्यंत अशा विद्यार्थ्यांचा प्रवेश अस्थायी राहील.

६) अ) आवेदन पत्रासोबत पासपोर्ट आकाराची स्वत:ची दोन छायाचित्रे सादर करावी. ब) ग्रंथालयासाठी ह्य फोटो (पोष्ट तिकिटाच्या आकाराचे) वेगळे आणावे.

७) नौकरी करणाऱ्या विद्यार्थ्याने प्रवेश घेताना ''कार्यालयीन वेळात देखील पूर्ण तास उपस्थित राहण्यास परवानगी दिली आहे.'' अशा आशयाचे आपले कार्यालय किंवा संस्था प्रमुखाचे प्रमाणपत्र जोडावे.

८) आर्थिक मागास असलेल्या व शिक्षण सवलतीचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्यांनी उत्पन्नाच्या दाखल्याच्या प्रत्येकी दोन प्रती सरपंच/तहसिलदाराच्या सही शिक्यासह जोडाव्यात.

९) मागील सत्रात किंवा या महाविद्यालयात यापूर्वी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेते वेळी जुने ओळखपत्र दाखविणे आवश्यक आहे.

१०) विद्यार्थ्यांच्या प्रवेश अर्जाचा विचार तत्संबंधी नियुक्त केलेली समिती करील. अशा विद्यार्थ्याला ठरविलेल्या दिवशी प्रत्यक्ष भेटीकरिता यावे लागेल. प्रवेश दिल्यानंतर प्रत्येकाला परिचय पत्र (Identity Card) देण्यात येईल.

११) आवेदन पत्रासोबत जोडावयाची सर्व आवश्यक कागदपत्रे जोपर्यंत प्राप्त होत नाहीत तसेच संपूर्ण शुल्क भरले जात नाही तोपर्यंत प्रवेश पूर्ण होणार नाही.

१२) महाविद्यालयाकडून प्रवेश नाकारण्यात आल्यास किंवा विद्यार्थी स्वेच्छेने सोडून गेल्यास आवेदन पत्रासोबतची प्रमाणपत्रे ह्या संबंधीच्या नियमानुसारच परत करण्यात येतील.

१३) महाविद्यालयात येतांना परिचय पत्र रोज आणावे लागेल. हरविल्यास ५० रू. मूल्य देवून दुसरी प्रत प्राप्त करावी लागेल.

१४) महाविद्यालयामध्ये सर्व विद्यार्थ्यासाठी इंटनेट सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे इच्छुक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या U.G.C. नेटवर्क रिसोर्स सेंटर मध्ये संपर्क साधावा.

१५) महाविद्यालयातील स्नेह मेळाव्याच्या संदर्भात अंतिम निर्णय मा. प्राचार्यांचा राहिल.

१६) पहिल्या सत्रात एकदाच बोनाफाईड सर्टीफिकेट काढल्यास शुल्क लागणार नाही. परंतु द्वितीय सत्रामध्ये बोनाफाईड सर्टीफिकेटसाठी ५० रू. महाविद्यालय विकास निधी शुल्क भरावे लागेल.

१७) आपला मोबाईल क्रमांक व इमेल बदलविल्यास महाविद्यालयाला तात्काळ कळवावे.

१७) शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती फार्म वेळेत भरावा अन्यथा पूर्ण शिक्षण शुल्क भरावे लागतील.



विद्यापीठ गीत

### या भारतात बंधुभाव नित्य वसू दे...

या भारतात बंधुभाव नित्य वसू दे ।
दे वरचि असा दे।
हे सर्व पंथ–संप्रदाय एक दिसू दे।
मतभेद नसू दे।। धृ.।।

नांदोत सुखे गरिब–अमिर एकमतानी।
मग हिंदु असो, ख्रिश्चन, वा हो इस्लामी।
'स्वातांयसुखा' या सकलामाजि वसू दे।
दे वरचि असा दे ।।१।।

सकळांस कळो, 'मानवता, राष्ट्रभावना'।
हो सर्वस्थळी मिळूनि 'समुदाय–प्रार्थना'।
उद्योगि तरूण वीर, शीलवान दिसू दे।
दे वरचि असा दे ।। २।।

हा जातिभाव विसरूनिया एक हो आम्ही।
अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातुनी।
खळ–निंदका–मनीहि 'सत्य–न्याय' वसू दे।
दे वरचि असा दे ।। ३।

सौंदर्य रमो घरघरांत स्वर्गि ज्यापरी।
ही नष्ट होऊ दे विपत्ति, भीति बोहरी ।
तुकडयास सदासर्वदा सेवेस वसू दे।
दे वरचि असा दे ।।४।।

—राष्ट्रसंत तुकडोजी महाराज




राज्यगीत

### महाराष्ट्र राज्याचे राज्यगीत

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।। धृ ।।

भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिव शंभू राजा
दरीदरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।१ ।।

काळया छातीवरी कोरली अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीव घेणी
दारिद्रयाच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचे ही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा ।। २ ।।



महाविद्यालय गीत

### हम करें राष्ट्र आराधन

हम करें राष्ट्र–आराधन
तन से,मन से, धन से,
तन, मन, धन, जीवन से,
हम करें राष्ट्र–आराधन ।।१।।
अन्तर से मुख से, कृति से,
निश्चल हो निर्मल मति से,
श्रध्दा से, मस्तक नत से,
हम करें राष्ट्र अभिवादन ।।१।।
अपने हंसते शैशव से,
अपने खिलते यौवन से,
प्रौढता पूर्ण जीवन से,
हम करें राष्ट्र का अर्चन ।। २ ।।
अपने अतीत को पढकर
अपना इतिहास उलट कर
अपना भवितव्य समझकर,
हम करें राष्ट्र का चिंतन ।। ३।।
हैं याद हमें युग–युग की,
जलती अनेक घटनायें
जो माँ की सेवा–पथ पर,
आयी बनकर विपदाएं ।।४।।
हमने अभिषेक किया था,
जननी का अरि–शोणित से,
हमने श्रृंगार किया था,
माता का अरि–मुण्डों से, ।।५ ।।
हमने ही इसे दिया था,
सांस्कृतिक उच्च सिंहासन
माँ जिस पर बैठी सुख से,
करती थी जग का शासन, ।।५।।
अब काल–चक्र की गति से
वह टूट गया सिंहासन,
अपना तनमन धन देकर
हम करें पुन: संस्थापन
हम करें राष्ट्रआराधन ।। ६ ।।

## NAGPUR UNIVERSITY

No. R/98/ CS/BCUD K13961
Dt/- February, 1998
13/2/98

To

**The Principal,**
**Samarth Mahavidyalaya,**
**Lakhani, Distt.- Bhandara.**

Ref:- Your Application for Permanent Affiliation.

With reference to above, this is to inform you that your application for Permanent Affiliation has been processed as per the provisions of Section 88 of the Maharashtra University Act, 1994 and Direction No.3.1997 issued by the Hon'ble Vice-Chancellor. A committee constituted by the Board of College & University Development has scrutinised the infrastructural facilities, academic, administrative and financial standards of your college. The report of the Committee was considered and approved by the Board of College & University Development in its meeting held on 21st Nov... .997 and thereafter by the Academic Council in its meeting held on 29th November, 1997 ..ordingly, your college has been accorded permanent Affiliation in the Faculties and subjects given below only :

| Sr. No. | Faculty | Courses/Subjects |
|---|---|---|
| 1. | Faculty of Arts : (For B.A. Classes) | Compulsary English, Compulsary Marathi, Marathi Literature, Sociology, Political Science, Economics, History |
| 2. | Faculty of Commerce : (For B.Com. Classes) | Compulsary English, Compulsary Marathi, Financial A/C Paper I, II & III, Economics/Monetary Economics & Economics Planning, Business Pro. & Practice, Business Management & Administration, Cost Accounting, Office Management & Administration, Business Math. & Stat. Management Accounting, Mercontile & Industrial Law, Management of Human Resources, Taxation Accounting |

(N.S. Bhave)
Registrar
Nagpur University, Nagpur.

**समर्थ महाविद्यालय, लाखनी**

## शुल्कासंबंधी तपशिल College Fees 2024-25

विद्यापीठाचे पत्र क्रमांक– सतुमनावि/विद्या/शि/शु./२४/३२०
दि. ०४/०७/२०२४ नुसार

**1) Tution Fees**

| | |
|---|---|
| A) U.G. Arts/Commerce (अनुदानित विद्याशाखा) | 800.00 |
| Science (B.SC) (कायम विनाअनुदानित विद्याशाखा) | 10619.00 |
| B) P.G. Arts | 10619.00 |
| Commerce | 9437.00 |
| C) Non-Sub. | |
| **2) Laboratory Fees :** | 824.00 |
| | 1416.00 |
| A) U.G. Arts Faculty (Geography,Music,Home Eco.) | 944.00 |
| Science Faculty (CBZ, MCB) | **1887.00** |
| Science Faculty (MATH) | |
| B) P.G. Deography /Home Economics | |

**3) Term Fees :**

| | U.G. Arts/Com. | U.G. Science | P.G. |
|---|---|---|---|
| i) Library Fee | | | |
| ii)Games/Sports & Gymkhana | 275.00 | 412.00 | 550.00 |
| iii) Medical Examination Fee | 330.00 | 112.00 | 412.00 |
| iv) Physical Efficiency Test | 47.00 | 35.00 | 35.00 |
| v) Student-Aid - fund | 46.00 | 35.00 | 35.00 |
| vi) Extra curricular Activities | 71.00 | 117.00 | 117.00 |
| vii) College magazine | 110.00 | 207.00 | 207.00 |
| **Total** | 137.00 | 137.00 | 137.00 |
| **4) University Fees : A) U.G/P.G.** | **1616.00** | **1355.00** | **1493.00** |

| | |
|---|---|
| i) Enrolment Fees (only for B.A/B.com/B.Sc.) | 151.00 |
| ii) Annual Fee | 172.00 |
| iii) Student welfare fund | 5.00 |
| iv) Medical-Aid fund | 5.00 |
| v) Student Union Fee | 5.00 |
| vi) Medical Examination Form | 5.00 |
| vii) Games/Sports Fee | 34.00 |
| viii) Ashwanegh Fee | 36.00 |
| ix) E-mail suvidha (only for I & II students) | 68.00 |
| x) Student - Aid fund | 5.00 |
| xi) Disaster management | 14.00 |
| xii) Environmently Fee (only for B.A/B.com/B.Sc.) | 128.00 |
| xiii) Immegration Fee | 200.00 |
| ix) Student Accident Insurance. | 40.00 |
| x) N.S.S. | 10.00 |

| **5) Admission Fees :** | **U.G. Arts/Com.** | **U.G. Science** | **P.G.** |
|---|---|---|---|
| i) Admission/Registration Fee | 20.00 | 137.00 | 275.00 |
| ii) Identity Card | 28.00 | 28.00 | 28.00 |
| iii) Library Card | 20.00 | 20.00 | 20.00 |
| vi)College Examination | 50.00 | 50.00 | 50.00 |
| v) (Only For B.Sc./M.A.) Non-Granted Course | | | |
| **Total** | **118.00** | **235.00** | **373.00** |

**6) Other Fees:- (Only For B.Sc./M.A.)Development Fund**

| | | | |
|---|---|---|---|
| I) Development Fund | ----- | 824.00 | 824.00 |
| ii) Maintenance Fund | ----- | 687.00 | 550.00 |

टीप : यावर्षी महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याकडून क्लाऊड टेक्नॉलॉजीचे अतिरीक्त १००रु. शुल्क भरावे लागेल.

टीप : वरील फीस पूर्ण शुल्क भरणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आहे. (शिष्यवृत्ती धारकासाठी लागू नाही.)

## महाविद्यालयातील अभ्यासक्रम

महाविद्यालयात बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी, एम.ए.(इंग्रजी, संस्कृत, मराठी, राज्यशास्त्र, गृहअर्थशास्त्र,) एम.कॉम. या वर्गाचे अभ्यासक्रम शिकविले जातात. महाविद्यालयात प्रवेश घेतांना विद्यार्थ्यांनी पुढील सूचना नीट काळजी पूर्वक वाचाव्यात. विद्यापीठाच्या वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सुचनेनुसार पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश 'ऑनलाईन प्रवेश' प्रक्रियेद्वारे केले जातील. अपेक्षित विद्यार्थी संख्या मिळाल्यावरच आपल्या प्रवेशासंबंधी अंतिम निर्णय कळविण्यात येईल.

## विद्यार्थ्यांसाठी महत्वाच्या सूचना

१) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन परिसरात आपले वर्तन शिष्टाचार युक्त ठेवावे.

२) महाविद्यालयाच्या सत्रारंभी मा. प्राचार्य सर्व वर्गात विद्यार्थ्यांना ठराविक दिवशी संबोधित करतील. प्राचार्य कोणत्या दिवशी, कोणत्या वर्गाला संबोधित करतील याची पूर्वसूचना फलकावर लावली राहील. हया सूचना विद्यार्थ्यांसाठी वर्षभराच्या मार्गदर्शनपर सूचना असल्यामुळे या दिवशी विद्यार्थ्यांची उपस्थिती अनिवार्य आहे.

३) 'हम करे राष्ट्रआराधन' हे महाविद्यालयाचे गीत म्हणून निवडले आहे. हे गीत सर्व विद्यार्थ्यांना पाठ असणे आवश्यक आहे.

४) महाविद्यालयाच्या परीसरात लिहीलेले निरनिराळे फलक (बोर्डस) विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक वाचावे.

५) विद्यार्थ्यांना महाविद्यालयास काही तक्रारी किंवा सूचना करावयाच्या असल्यास महाविद्यालयाच्या तक्रारपेटीत लेखीसूचना टाकता येईल.

६) <u>बी.ए. भाग १,२,३व बी. कॉम. भाग १,२,३ साठी सारखाच गणवेश राहील, गणवेशाचे कापड पांढऱ्या रंगाचा शर्ट व काळया रंगाची पेंट राहील व मुलींसाठी काळा सलवार व पांढरा कर्ता सहील. बी.एससी. च्या विद्यार्थ्यांसाठी गणवेशाचे कापड आकाशी रंगाचा शर्ट व काळया रंगाची पँट राहील. मुलीसाठी काळया रंगाचा सलवार व आकाशी रंगाचा शर्ट राहील.</u>

७) विना अनुदान तत्वावर मान्यता मिळालेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतांना संपूर्ण वर्षाचे शुल्क व इतर निधी पूर्ण भरावा लागेल. त्याशिवाय प्रवेश मिळणार नाही.

८) पाल्याच्या गैरवर्तणुकीच्या वेळी बरेचदा पालकांना बोलावून देखील ते येत नाहीत अशावेळी विद्यार्थ्यांच्या गैरवर्तणुकीबद्दल विद्यार्थ्यांला ताबडतोब महाविद्यालय सोडण्याचे प्रमाणपत्र दिले तर यावर पालकांचा उजर ऐकला जाणार नाही. या संबंधात मा. प्राचार्यांचा निर्णय अंतिम राहील.

९) वरिष्ठ महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रिया विद्यापीठ व शासन यांच्या नियमांच्या आधीन राहील. या संदर्भात आवश्यक सूचना, वेळोवेळी सूचना फलकावर लावल्या जातील.

१०) वरिष्ठ विभागाचे वर्ग विद्यापीठाच्या शैक्षणिक वेळापत्रका नुसार सुरु होतील. या महाविद्यालयात चालू शैक्षणिक वर्षाच्या अगोदरच्या वर्षात शिकलेल्यांना प्रवेश देण्याबाबत अग्रक्रमाने विचार केला जाईल. मात्र त्यांच्याकडून नियोजित दिनांकाच्या आंत प्रवेश आवेदनपत्रे महाविद्यालयात रीतसर सादर झालेली असली पाहिजेत.

११) १२ वी चा निकाल लागल्यानंतर पहिल्या आठवडयात प्रथम वर्ष कला व वाणिज्य व विज्ञान शाखेसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू होईल व त्या संबधी सविस्तर सूचना लावल्या जातील.

१२) विद्यार्थ्यांनी  या पुस्तिकेतील सर्व माहिती काळजीपूर्वक वाचावी. नंतरच महाविद्यालयात प्रवेश घ्यावा अणि निर्देशित नियमांचे काटेकोर पालन करावे. ह्यापूर्वी जे विद्यार्थी या महाविद्यालयात शिकले त्यांनी प्रवेश घेतांना स्वत:चे त्या वर्षाचे ओळखपत्र आणावे.

१३) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या शिस्तीचे काटेकोरपणे पालन करावे. प्राध्यापक वर्ग व इतर संबंधित कर्मचाऱ्यांशी त्यांची वर्तणूक आदरपूर्ण असावी. विद्यार्थ्यांच्या परस्परांच्या संभाषणात व वर्तणुकीत सभ्यता असावी. महाविद्यालयाच्या आवारातील गैरवर्तन व गैरशिस्तपणा कडक शिक्षेस पात्र ठरेल. अक्षम्य गैरवर्तणुकीबद्दल विद्यार्थ्याला महाविद्यालयातून काढण्यात येईल.

१४) कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही कारणास्तव चालू असलेले वर्ग व महाविद्यालयाचे इतर कामकाज यात विद्यार्थ्यांच्या गैरवर्तणुकीमुळे अडथळा येता कामा नये अन्यथा तो दंडास पात्र ठरेल.

१५) महाविद्यालयाची सर्व मालमत्ता विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक वापरावी अशी अपेक्षा आहे. तसेच या मालमत्तेची हेतूपुरस्पर केलेली हानी आणि अश्लील व घाणेरडी वाक्ये लिहून तिचा केलेला कोणताही दुरूपयोग दंडनीय ठरविण्यात येईल.

१६) महाविद्यालयात मिळणाऱ्या कोणत्या शिष्यवृत्ती व सवलतीना आपण पात्र आहोत. हे ठरविण्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्यांची व त्यांच्या पालकांची आहे. त्याचप्रमाणे त्यासाठी आवश्यक अर्ज व कागदपत्रे वेळेवर देण्याची जबाबदारी विद्यार्थी व पालकांची आहे. या शिष्यवृत्ती अथवा सवलती कोणत्याही कारणाने विद्यार्थ्यास न मिळाल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही. त्यांना महाविद्यालयाचे शिक्षण शुल्क इ. स्वत: द्यावे लागेल. विलंबाबद्दल विलंब शुल्क सुद्धा आकारले जाऊ शकते.७५% पेक्षा कमी उपस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार नाही.

१७) शिष्यवृत्ती अथवा शासनाकडून प्राप्त व्हावयाच्या तत्संबधी रकमा महाविद्यालयात प्रत्यक्ष जमा झाल्याशिवाय त्याचे वाटप होणार नाही. शिष्यवृत्ती देण्यास अमुक विद्यार्थी पात्र आहे. अशी खात्री असल्यास त्यास शिष्यवृत्तीची (ॲडव्हांस) रक्कम दिली जाते हे लक्षात घ्यावे. महाविद्यालय कोणतीही अग्रिम रक्कम कुणाही विद्यार्थ्यास देणार नाही. शिष्यवृत्तीधारकांना विद्यापीठ परीक्षा शुल्काची तरतूद (परीक्षा फॉर्म भरतेवेळी) त्याच्या शिष्यवृत्तीतूनच किंवा स्वत: जवळून करावयाची असते. तसेच शिक्षण शुल्काचीही रक्कम त्यांना देय शिष्यवृतीतूनच भरावयाची असते हे लक्षात घ्यावे. तीही वेळच्या वेळी न भरल्यास अन्य विद्यार्थ्यांना जसा विलंबाबद्दल दंड होतो तसा दंड आकारण्याचे अधिकार महाविद्यालयाला आहेत.

१८) कोणालाही कोणत्याही परिस्थितीत डुप्लीकेट टी. सी. वर प्रवेश दिला जाणार नाही. मुळ प्रमाणपत्र द्यावेच लागेल. प्रवेशाचे वेळी दिलेले प्रमाणपत्र कोणत्याही कारणासाठी परत मिळणार नाही. ि विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतेवेळी शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, जातीचे प्रमाणपत्र इत्यादी झेरॉक्स पुरेशा काढाव्यात.

१९) सर्व प्रकारचे शुल्क भरण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांचीच आहे.

२०) वरील सूचना व्यक्तीरिक्त इतर प्रसंगोपात्त आवश्यक सूचना विद्यार्थ्यांना वेळोवेळी देण्यात येतील. वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांकडे विद्यार्थ्यांनी लक्ष दयावे.

२१) बी.ए. १, बी.कॉम. १ व बी. एससी १ यामध्ये प्रथमत: प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला नामांकन पत्र भरणे आवश्यक राहील. याशिवाय कोणत्याही वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याचे नामांकन झाले नसेल तर त्यालाही नामांकन शुल्क भरणे व नामांकन पत्र भरणे आवश्यक राहील. सोबतच ABC ID जोडणे आवश्यक राहील.

२२) प्रवेशा संबंधीच्या तारखा, परीक्षेच्या तारखा, सत्र सुरूवात आणि समाप्तीच्या तारखा विद्यापीठाच्या सूचनांप्रमाणे राहतील. विद्यार्थ्यांना यासंबंधी फलकावर माहिती लिहून वेळोवळी कळविण्यात येईल. म्हणून विद्यार्थ्यांनी नियमितपणे सूचना फलक वाचण्याची सवय ठेवावी.

२३) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात भरुन द्यावयाच्या आवश्यक कागदपत्रांवर आपली नावे १० वी व १२ वी च्या गुणपत्रिकेवर नमूद केल्याप्रमाणे स्पेलींग लिहुन नमूद करावी तसेच आपण घेतलेले विषय जे आहेत त्याप्रमाणे मशीनकार्डवर लिहावे तसेच एडिट लिस्ट लागल्यावर आपले नाव व आपण घेतलेले विषय बरोबर आहेत की नाही याची खात्री करून घ्यावी.

२४) NEP २०२० नुसार प्रत्येक विषयाच्या गृहपाठ वहया प्रत्येक सत्रात विषय शिक्षकाकडे जमा करणे आवश्यक राहील.

२५) प्रत्येक महिन्याच्यादुसऱ्या व चौथ्या शनिवारी नो व्हेहिकल डे राहील.

२६) महाविद्यालयात रजिस्ट्रेशन, स्कॉलरशिप व इतर फार्म भरण्याचे सुविधा केंद्र उपलब्ध आहे.

२७) पदवीच्या विद्यार्थ्यांकरीता विमा योजना लागू आहे.

# अभ्यासक्रम , प्रवेश पात्रता व नियम

## कला शाखा (Arts Faculty)

### Sem I & Sem II प्रथम वर्ष कला (B.A.I)

पात्रता :— महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाची उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (H.S.S.C.) परीक्षा नवीन अभ्यासक्रमा नुसार १२ व्या वर्गाची परीक्षा उत्तीर्ण झालेला विद्यार्थी किंवा नागपूर विद्यापीठाने मान्यता दिलेली समकक्ष परीक्षा उत्तीर्ण झालेला विद्यार्थी पात्र राहील.

विषय : NEP २०२० नुसार १) इंग्रजी २) मराठी ३) संस्कृत ४) राज्यशास्त्र ५) समाजशास्त्र ६) इतिहास ७) मराठी वाङ्मय ८) अर्थशास्त्र ९) गृहअर्थशास्त्र

विषय निवडतांना हे लक्षात घेणे आवश्यक आहे :—

वरील विषयांचे तीन ग्रुप मध्ये विभाजन असून
ग्रुप अ) १) इंग्रजी २) मराठी ३) संस्कृत
ग्रुप ब) १) राज्यशास्त्र २) समाजशास्त्र ३) इतिहास
ग्रुप क) १) मराठी वाङ्मय २) अर्थशास्त्र ३) गृहअर्थशास्त्र
ग्रुप ड) १) इंग्रजी वाङ्मय २) भूगोल ३) संगीत

* प्रत्येक विषयाच्या मर्यादा क्षमतेवर अंतिम निर्णय प्राचार्यांचा राहील.
*वरील तीन ग्रुप व्यतिरिक्त चौथा ग्रुप हा विना अनुदानीत विषयांचा राहील.
*ग्रुप ड) मधील विषयांमध्ये प्रवेश घ्यायचा असल्यास प्राचार्यांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.
*ग्रुप ड मधील विनाअनुदानित विषयांकरीता अतिरिक्त शुल्क भरावे लागेल.

### Sem III & Sem IV द्वितीय वर्ष कला (B.A.II)

पात्रता :— NEP २०२० नुसार नागपूर विद्यापीठाची Sem I व Sem II परीक्षा उत्तीर्ण झालेले किंवा Sem I वं Sem II मिळून ५०% विषयात उत्तीर्ण झालेले विद्यार्थी पात्र ठरतील अथवा विद्यापीठाला मान्यता असलेली समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असलेले विद्यार्थी प्रवेशाकरिता पात्र ठरतील.

विषय :— NEP २०२० नुसार द्वितीय वर्ष Sem III व Sem VI कला परीक्षेसाठी घेतलेले विषय राहतील.

सूचना :— या वर्गासाठी प्रवेश देतांना मागील शैक्षणिक सत्रातील विद्यार्थ्यांचा प्राधान्याने विचार केला जाईल. नंतरच जागा शिल्लक असल्यास महाविद्यालयीन माजी विद्यार्थ्यांचा प्रवेशासाठी विचार केला जाईल. ह्यानंतर जागा शिल्लक असल्यास इतर महाविद्यालयीन विद्यार्थ्याचा प्रवेशासाठी विचार केला जाईल.

### Sem V & Sem VI तृतीय वर्ष कला (B.A.III)

पात्रता — नागपूर विद्यापीठाची Sem-III o Sem-IV (द्वितीय वर्ष कला) ही परीक्षा उत्तीर्ण झालेले व ATKT सुट प्राप्त विद्यार्थी पात्र ठरतील किंवा विद्यापीठाला मान्यता असलेली समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असलेले विद्यार्थी पात्र ठरतील. Sem-I,II, III व IV (प्रथम व द्वितीय वर्षाची) गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे. मात्र प्रथम वर्ष कला परीक्षा उत्तिर्ण होणे आवश्यक आहे.

विषय :— Sem-I, II, III व IV (प्रथम व द्वितीय वर्ष कला) परीक्षेसाठी घेतलेले विषय.

विशेष सूचना:— १) बी.ए. ३ प्रवेशासाठी Sem I व II (प्रथम वर्ष कला) शाखेची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. २) ह्या वर्गासाठी सर्वप्रथम महाविद्यालयातील मागील सत्रातील विद्यार्थ्याला प्रवेश दिला जाईल व त्यानंतर माजी विद्यार्थी व इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा विचार केला जाईल. (प्रवेशा बाबतचा अंतिम निर्णय मा. प्राचार्यांचा राहील.)

## वाणिज्य शाखा (Commerce Faculty)

### प्रथम वर्ष वाणिज्य (B.Com.I)

वणिज्य विभागाचे पदवीचे वर्ग दुपारी कला शाखेसोबत राहतील.
पात्रता : कला/वाणिज्य/विज्ञान विषय घेऊन महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाचीउच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा (H.S.S.C.) उत्तीर्ण झालेले विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र राहतील.

पात्रता :— महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाची उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (H.S.S.C.) परीक्षा नवीन अभ्यासक्रमा नुसार १२ व्या वर्गाची परीक्षा उत्तीर्ण झालेला विद्यार्थी किंवा नागपूर विद्यापीठाने मान्यता दिलेली समकक्ष परीक्षा उत्तीर्ण झालेला विद्यार्थी पात्र राहील.

विषय : 1.Accounting and Taxation 2.Business Administration 3.Finance and Banking 4.Computer Application

सूचना : B.Com भाग १ मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी वरील विषयापैकी कोणताही एक विषय Mejor म्हणून घ्यावा.

### द्वितीय वर्ष वाणिज्य (B.Com.II)

पात्रता :— NEP २०२० नुसार नागपूर विद्यापीठाची Sem I व Sem II परीक्षा उत्तीर्ण झालेले किंवा Sem I वं Sem II मिळून ५०% विषयात उत्तीर्ण झालेले विद्यार्थी पात्र ठरतील अथवा विद्यापीठाला मान्यता असलेली समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असलेले विद्यार्थी प्रवेशाकरिता पात्र ठरतील.

विषय :— NEP २०२० नुसार द्वितीय वर्ष Sem III व Sem IV वाणिज्य परीक्षेसाठी घेतलेले विषय राहतील.

सूचना :— या वर्गासाठी प्रवेश देतांना मागील शैक्षणिक सत्रातील विद्यार्थ्याचा प्राधान्याने विचार केला जाईल. नंतरच जागा शिल्लक असल्यास महाविद्यालयीन माजी विद्यार्थ्यांचा प्रवेशासाठी विचार केला जाईल. ह्यानंतर जागा शिल्लक असल्यास इतर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा प्रवेशासाठी विचार केला जाईल.

### तृतीय वर्ष वाणिज्य (B.Com.III) CBCS

पात्रता : नागपूर विद्यापीठाची Sem III, IV (द्वितीय वर्ष वाणिज्य) ही परीक्षा उत्तीर्ण झालेले A.T.K.T. सुट प्राप्त ठरतील किंवा प्रवेशासाठी समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असलेले विद्यार्थी पात्र ठरतील. Sem I, II, III, IV (प्रथम व द्वितीय वर्षाची) गुणपत्रिका प्रवेश अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. मात्र प्रथम वर्ष वाणिज्य परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**Sem : V**

1.Financial Accounting-III
2.Tax procedure and practice
3.Human Resource Managment
4.Agricultural Economics
5.Cost Accounting
6. Company Audit

**Sem : VI**

1.Financial Accounting
2.International Economics
3.Advanced Statistics
4.Financial Managment
5.Managerial Accounting
6.Marketing Process

महत्वाची सूचना: B.A. B.Com. B.Sc. चे अभ्यासक्रम विद्यापीठ/शासन निर्देशानुसार राहतील.

**:: ज्ञानगंगा घरोघरी ::** "यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे मान्यताप्राप्त अभ्यासकेंद्र व परीक्षाकेंद"

ज्याना काही कारणास्तव आपले शिक्षण अर्धवट सोडावे लागले त्यांना पुढील शिक्षणासाठी समर्थ महाविद्यालयाने आपल्या अभ्यासकेंद्र मार्फत शिक्षण पुर्ण करण्याची सुवर्ण संधी निर्माण करुन दिली. प्रवेशासाठी वयोमर्यादा २१ वर्ष पुर्ण असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाद्वारे १९८९ मध्ये स्थापन झालेले यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ लोकविद्यापीठाच्या भूमिकेतून सर्वासाठी शिक्षण या ध्येयाने शैक्षणिक चळवळ उभी आहे. गरजू, जिज्ञासू व कोणत्याही कारणाने शिक्षणापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याची वा अपूरे राहिलेले शिक्षण पूर्ण करण्याची संधी विद्यापीठाने उपलब्ध करुन दिली आहे. या अभ्यासकेंद्र अंतर्गत बी.ए.भाग १,२,३ व बी.कॉम. भाग १,२,३ चे अभ्यासक्रम चालविले जातात.या अभ्यासकेंद्रामध्ये एकूण २०समंत्रक कार्य पार पाडीत आहेत.

# पदव्युत्तर विभाग (Post Graguate )

## एम.ए. व एम.कॉम भाग १ च्या सर्व विद्यार्थ्यांकरीता महत्वाची सूचना

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व महाराष्ट्र शासन निर्देशानुसार NEP- 2020 सत्र 2023-24 पासून सुरु करण्यात आली आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी सूचनांकडे लक्ष द्यावे.**

## M.A. Home Economics (गृहअर्थशास्त्र)

### Semester - I

Major Course - Compulsory Subjects
Paper I - Resourse Managment
Paper II- Human Development
Paper III - Textile and Clothing
Paper IV- Research Methods and Statistics
Paper V- Electives Mandatory (Any One)
Elective Paper - Early Childhood care and Education (ECCE)
Practical - Textile and clothing practical
Paper VI - Reserch Methodology (RM)

### Semester - II

Major Course - Compulsory Subjects
Paper I - Resource Management
Paper II- Human Development
Paper III - Textile and Clothing
Paper IV- Consumer and the Market
Paper V- Electives Mandatory (Any One)
Elective Paper - Garbha Sanshkar
Practical - Textile and clothing
On the Job Training OJT / Field Project (FP) Mandatory

### Semester-III

Major Course - Major Subjects
Paper I - Food and Nutrition
Paper II- Family Dynamics
Paper III - Optional Subjects (Any one) From Elective 1(a) Home Science Extension Education
Paper IV- Consumer and the Market
Paper V- Electives Mandatory (Any One)
Elective Paper - Gender Nad Development
Practical - Food and Nutrition
Research Projects (RP)

### Semester-VI

Major Course - Four Major Subjects
Paper I - Food and Nutrition
Paper II- Family Dynamics
Paper III - Optional Subjects (Any one) From Elective 1(a), 1(b)
Major Elective - 1(a) Home Science Extension Education
Major Elective 1(b)
Paper IV- Electives (Any One)
1.Entrepreneurship Development
Practical - Food and Nutrition
Research Projects (RP)

## M.Com.

### Semester - I

Paper I - Organizational Behavior
Paper II- Business Law
Paper III - Managerial Economics
Paper IV- Fundamental of Financial Managment/ International Business
Paper V- Reserch Methodology

### Semester - II

Paper I - Indian Finacial System
Paper II- Company Law
Paper III - Project Managment
Paper IV- Advance Financial Managment/ Basic of GST
Paper V- On job Traning

### Semester-III

Paper I - Human Resource Managment
Paper II- Service Sector Managment
Paper III - Cooperation and Rural Development
Paper IV- Agricultural Economics/ Indian Banking System
Paper V- Reserch Project

### Semester-VI

Paper I - Entreneuship Development
Paper II- Cooperation Social Responsibility
Paper III - Marketing Mangment
Paper IV- International Marketing/ Insurance Procedures and Practices
Paper V- Reaserch Project

### अनिवार्य संगणक शिक्षण

महाराष्ट्र शासनाच्या निर्णय क्र. ३७००/(१३२)/२०००/तांशि.३ दि. ०३ ऑक्टोंबर २००२ नुसार १ जानेवारी २००१ पासून शासकीय सेवेत असणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना संगणक व्यावहारिक ज्ञान अनिवार्य केलेले आहे. महाविद्यालयातील विद्यार्थी/विद्यार्थीनींना सुध्दा माहिती तंत्रज्ञान विषयांतर्गत संगणकाचे ज्ञान आवश्यक झालेले आहे. या अनुषंगाने संबंधीत सर्व सूचना विद्यार्थ्यांना महाविद्यालय सुरु झाल्यावर योग्य वेळी देण्यात येईल.

## M.A. Marathi

### Semester - I

Major (मुख्य विषय )
Mandatory (मुख्य विषय )
पेपर १– प्राचीन व मध्ययुगीन साहित्याचा इतिहास
पेपर २ – साहित्यशास्त्र
पेपर ३ – आधुनिक मराठी नाटक
पेपर ४ – आधुनिक मराठी कथा
पेपर ५ – संशोधनशास्त्र
Elective (वैकल्पिक विषय)
(खालीलपैकी कोणताही एक )
पेपर ६– विशेष वाङ्‌मय प्रकार : कादंबरी
पेपर ६ – विशेष ग्रंथकार : वि.वा. शिरवाडकर
पेपर ६ – विशेष ग्रंथकार : यशवंत मनोहर

### Semester - II

Major (मुख्य विषय )
Mandatory (मुख्य विषय )
पेपर १ – आधुनिक मराठी साहित्याचा इतिहास
पेपर २ – आधुनिक मराठी कविता
पेपर ३ – साहित्य– समीक्षा
पेपर ४ – पाश्चात्य साहित्य सिध्दान्त
Elective (वैकल्पिक विषय)
(खालीलपैकी कोणताही एक )
पेपर ५ – मराठी निबंध वाङ्‌मय
पेपर ५ – मराठी ललित गद्य
पेपर ५ – चित्रपट आणि साहित्य
Mandatory प्रशिक्षण कार्य किंवा क्षेत्र–प्रकल्प

### Semester - III

Major (मुख्य विषय )
Mandatory (मुख्य विषय )
पेपर १ – प्राचीन आणि मध्ययुगीन काव्य
पेपर २ – मराठी भाषा, बोली आणि व्याकरण
पेपर ३ – नवे साहित्यप्रवाह (ग्रामीण, दलित व आदिवासी)
पेपर ४ – प्रसारमाध्यमे आणि साहित्य व्यवहार
Elective (वैकल्पिक विषय)
(खालीलपैकी कोणताही एक )
पेपर ५ – वाङ्‌मयीन चळवळी
पेपर ५ – पर्यावरण आणि साहित्य
पेपर ५ – साहित्याचा सामाजिक व सांस्कृतिक अभ्यास
Reserch Project शोधप्रकल्प

### Semester -VI

Major (मुख्य विषय )
Mandatory (मुख्य विषय )
पेपर १ – मध्ययुगीन काव्य आणि आधुनिक गद्य
पेपर २ – भाषाविज्ञान
पेपर ३ – लोकसाहित्य
Elective (वैकल्पिक विषय)
(खालीलपैकी कोणताही एक )
पेपर ४ – तौलनिक साहित्याभ्यास
पेपर ४ – स्त्रीवादी मराठी साहित्य
पेपर ४ – भाषांतरमीमांसा
Reserch Project शोधप्रकल्प

## M.A. Political Science

### Semester - I

**Major**
**Mandatory**
Paper I - Ancient & Medieval Indian Poltical Thought
Paper II- Indian Government and Politics
Paper III - International Relations
Paper IV- Political Theory
**Elective any One**
Paper V- International Law
Public Opinion and Curvey
Paper VI- Research Methodology

### Semester - II

**Major**
**Mandatory**
Paper I - Modern Indian Political Thought
Paper II- Pressure Groups and Social Movements
Paper III - Political of Maharashtra
Paper IV- Conflict and Peace Studies
**Elective any One**
Paper V- Applied Research Methodology in Political Science
Paper VI- On Job Training : Internship/Apprenticeship (OJT) OR Field Project

### Semester - III

**Major**
**Mandatory**
Paper I - Comparative Politics
Paper II- Public Administration
Paper III - Modern Political Ideologies
Paper IV- India's Foreign Policy in a New Global Order
**Elective any One**
Paper V- Political Psychology
Political Journalism
Paper VI- Research Project (RP)

### Semester - VI

**Major**
**Mandatory**
Paper I - State Politics in India
Paper II- Political Sociology
Paper III - Election Management in India
**Elective any One**
Paper V- Human Rights and Indian Constitution
Political Psephology
Paper VI- Research Project (RP)

## M.A. Sanskrit

### Semester - I

Major Mandatory
पेपर १ – वैदिक वाङ्‌मय्
पेपर २ – व्याकरणम्
पेपर ३ – भारतीयदर्शनम्
पेपर ४ – व्यावहारिक संस्कृतम
Elective (वैकल्पिक विषय)
(खालीलपैकी कोणताही एक )
पेपर ५ – आर्षमहाकाव्यम्
– पुराणवाङ्‌मयम्
– संस्कृतनाटयं नाटयशास्त्रम्
पेपर ६ – संशोधनविधिपरिचय
Research Methodology

### Semester - II

Major Mandatory
पेपर १ – लघुसिध्दान्तकौमुदी
पेपर २ – सांख्यकारिका
पेपर ३ – संस्कृतपद्याङ्‌मयम्
पेपर ४ – शोधपत्रलेखनम् प्रस्तुतीकरणम्
Elective (Select Anyone)
पेपर ५ – संस्कृतगद्यवाङ्‌मय
– लिप्य पुराभिलेखाश्च
– कोशवाङ्‌मयम्
पेपर ६ – Skill Based Activity Field Visit Project

### Semester - III

Major Mandatory
पेपर १ – संस्कृतनाटयम्
पेपर २ – चम्पूकाव्यम्
पेपर ३ – काव्यशास्त्रम्–काव्यप्रकाश:
OR
पेपर १ – वेदान्तसार
पेपर २ – अर्थसंग्रह:
पेपर ३ – तर्कभाषा
Major Mandatory
पेपर ४ – निरुक्तम्
Elective (Select Anyone)
पेपर ५ – अर्वाचीन संस्कृतसाहित्यम्
– स्मृतिग्रन्था:
– भाषाविज्ञानम्
पेपर ६ – Research Methodology & Project

### Semester - VI

Major Mandatory
पेपर १ – नाटयशास्त्रम्
पेपर २ – श्रीशिवभारतम्
पेपर ३ – काव्यमीमांसा
OR
पेपर १ – योगसमत्रम्
पेपर २ – तत्वार्थसूत्रम्
पेपर ३ – ब्रम्हसूत्रशाङ्करभाष्यम्
Elective (Select Anyone)
पेपर ४ – संस्कृत समीक्षाशास्त्रम्
– संस्कृत–शास्त्र–परिचय:
– भासनाटकत्रयम्
पेपर ५ – Research Project

## M.A. English

### Semester - I

**Major**
**Mandatory**
Paper I -English Poetry from Chaucer to the Eighteenth Century
Paper II- English Drama from the Elizabethan Age to Restoration Period
Paper III - The English Novel-1
Paper IV- The English Prose-1
**Elective (Any One)**
Paper V- Asian Literature
Travel Literature
Dalit Literature
**Mandatory**
Paper VI- Research Methodology

### Semester -II

**Major**
**Mandatory**
Paper I -English Poetry from Romantic to Postmodern age
Paper II- Modern English Drama
Paper III - The English Novel-II
Paper IV- The English Prose-II
**Elective (Any One)**
Paper V- American Literature
Trauma Studies
Tribal Literature
**Mandatory**
Paper VI- On Job Traninig/Field Project

### Semester -III

**Major**
**Mandatory**
Paper I - Indian Writing English
Paper II- Literary Criticisms and Theory
Paper III - Cultural Studies
Paper IV- The English Essay
**Elective (Any One)**
Paper V- African and Afroi-American Literature
Pandemic Studies and Literature
The History of Language
**Mandatory**
Paper VI- Research Project (to be continued to the

### Semester -VI

**Major**
**Mandatory**
Paper I - Indian Disapora Writing
Paper II- Literary Criticism and Theory -II
Paper III - Postcolonial Liletature
**Elective (Any One)**
Paper V- European Fiction and Drama
Disability Studies
The History of Language-II
**Mandatory**
Paper VI- Research Project (Carried on from the third Semester

टीप : पदव्युत्तर एम.ए. एम.कॉम. साठी संलग्नीकरण ६ विषयाचे असून विद्यापीठाच्या निर्देशानुसार प्रवेश दिले जातील याची नोंद घ्यावी.

सूचना : १)विद्यापीठाकडून अभ्यासक्रमामध्ये फेरबदल झाल्यास तशी स्वतंत्र सूचना सूचना फलकावर लावण्यात येईल. २)गणवेश – मागीलवर्षीप्रमाणे काळा पॅन्ट व आकाशी रंगाचा शर्ट राहील.

**समर्थ महाविद्यालय, लाखनी**

# विज्ञान विभाग (Science Departmnet)

## SCIENCE FACULTY

The candidate should have passed 12th Standard Examination of the Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education/CBSE/ICSE, with English at Higher or Lower level and any Modern Indian Language at higher or lower level together with any three science subjects comprised in the Faculty of Science or an examination recognized as equivalent there to in such subjects and with such standards of attainments as may be prescribed, and admission given as merit base.

| SN | Course Type | Choice for Selection |
|---|---|---|
| 1. | Major(Core) Subject (For Semester I &II) | A student is required to select her/his 'MAJOR' subject from amongst the choices provided by the college. Change of major subject shall not be permitted after the Admission form is submitted. Major subject Comprises of Mandatory and Elective Course. |
| 2. | Minor Subject (For Semester III &IV) | A student is required to select her/his 'MINOR' subject from amongst the choices provided by college during admission for 3rd Semester. Change of minor subject shall not be permitted after the examination form for 3rd Semester is submitted. |
| 3. | Open Elective Course (OE) | A student is required to select an 'OPEN ELECTIVE' from the 'Open Elective Basket' of any program offered by the university in any faculty before filling the Admission form for the semester concerned. Such an 'OPEN ELECTIVE' cannot be selected from the subjects chosen by a student as 'Major' and 'Minor' subjects. |
| 4. | Vocational Skill Course (VSC) | A student is required to successfully complete the 'VOCATIONAL SKILL COURSE' as mentioned in this scheme of examination. This course must be a course corresponding to the 'MAJOR' and/or MINOR subject selected by a student.<br>A student is allowed to earn credits for 'VOCATIONAL SKILL COURSE' by successfully completing online courses of equivalent credits from SWAYAM/NPTEL learning platforms or from other Higher Education Institutions affiliated to RTM Nagpur University. |
| 5. | Skill Enhancement Course (SEC) | A student is required to select a 'SKILL ENHANCEMENT COURSE' from the basket provided by the university for this purpose. |
| 6. | Ability Enhancement Course (AEC) | A student is required to undergo and successfully complete the 'ABILITY ENHANCEMENT COURSE' as mentioned in this scheme of examination. |
| 7. | Indian Knowledge System Course (IKS) | A student is required to undergo and successfully complete the 'INDIAN KNOWLEDGE SYSTEM COURSE' as mentioned in this scheme of Examination. |
| 8. | Value Education Course (VEC) | A student is required to undergo and successfully complete the 'VALUE EDUCATION COURSE' as mentioned in this scheme of examination. |
| 9. | Co-Curricular Course (CC) | A student is compulsory to complete 'Co-Curricular Course' as mentioned by the college |

**MAJOR SUBJECT LIST AVAILABLE**

B. Sc. Program are available at our college in the Faculty of Science, Student should select **any one subject** as a Major Subject from the following provided list.

- **Chemistry**
- **Zoology**
- **Botany**
- **Physics**
- **Biochemistry**
- **Mathematics**
- **Microbiology**
- **Biotechnology**

**For Example:-**. If a student selects Chemistry as Major, will not be eligible to take the Minor courses from the Minor baskets of Chemistry Provided by University basket at Semester III.

### B.Sc. Course Scheme

| S N. | Course Category | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | B.Sc. Sem-I | B.Sc. Sem-II | B.Sc. Sem-III | B.Sc. Sem-IV | B.Sc. Sem-V | B.Sc. Sem-VI |
| 1 | DSC (T) | DSC (T) | DSC | DSC | DSC | DSC |
| 2 | DSC (P) | DSC (P) | DSC | DSC | DSC | DSC |
| 3 | DSC (T) | DSC (T) | DSC | DSC | DSC | DSC |
| 4 | DSC (P) | DSC (P) | DSC | DSC | DSC | DSC |
| 5 | GE/OE | GE/OE | Minor | Minor | DSC | DSC |
| 6 | GE/OE | GE/OE | Minor | Minor | DSC | DSC |
| 7 | VSC | VSC | Minor | Minor | DSE | DSE |
| 8 | SEC | SEC | Minor | Minor | DSE | DSE |
| 9 | AEC | AEC | GE/OE | GE/OE | Minor | Minor |
| 10 | VEC | VEC | VSC | SEC | Minor | Minor |
| 11 | IKS | IKS | AEC | AEC | Minor | VSC |
| 12 | CC | CC | FP | CEP | Minor | OJT |

(DSC: Department/Subject Specific Core, OE: Generic/Open Electives, VSEC: Vocational Skills & Skill Enhancement Courses, VSC: Vocational Skill Courses, SEC: Skill Enhancement Courses, AEC: Ability Enhancement Courses, IKS: Indian Knowledge Systems, VEC: Value Education Courses, OJT: On Job Training (Internship/Apprenticeship), FP: Field Project, CEP: Community Engagement & Service, CC: Co- curricular Courses, RM: Research Methodology, RP: Research Project)

## तृतीय वर्ष (B.Sc.III) Semester V & VI

पात्रता – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची Sem- III,iV (द्वितीय वर्ष विज्ञान) ही परीक्षा उर्त्तीर्ण झालेले ATKT सुट प्राप्त विद्यार्थी पात्र ठरतील. Sem-I, II, III, IV (प्रथम व द्वितीय वर्षाची) गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे. Sem- I & II (प्रथम वर्ष) उर्त्तीर्ण होणे आवश्यक आहे.

विषय– द्वितीय वर्षात निवडल्याप्रमाणे

B.Sc.III (Sem- V & VI) चे खालीलप्रमाणे गृप राहतील.

1) Physics, Chemistry, Math (PCM)
2) Chemistry, Botony, Zoology (CBZ)
3) Biotechnology, Microbiology, Chemistry (BMC)
4) Chemistry, Biochemistry, Microbiology (CBM)

# शिष्यवृत्ती आणि शुल्क सवलत

कोणतीही शिष्यवृत्ती सवलत ७५% उपस्थिती आणि महाविद्यालयातील समाधानकारक वर्तणूक असल्यास मिळेल.

मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती :—

१) भारत सरकार मॅट्रकोत्तर शिष्यवृत्ती
२) राज्य सरकारची गुणवत्ता शिष्यवृत्ती
३) राज्य सरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती
४) अपंग विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती.
५)अनुसुचित जाती/जमाती/भटक्या जमाती यांना मिळणारी भारत सरकारची शिष्यवृत्ती.
६) एकलव्य आर्थिक सहाय्य योजना (फक्त पदव्यूत्तर वर्गासाठी)
७) बिडी/खाण कामगारांच्या मुलामुलींना मिळणारी शिष्यवृत्ती. यापैकी कोणतीही एकच शिष्यवृत्ती घेता येईल.

वरील शिष्यवृत्ती मिळण्यासाठी आवश्यक पात्रता व अटीसंबंधी नियमाची माहिती महाविद्यालयातून श्री. दि.प. सलामे कनिष्ठ लिपीक यांचेकडून संबंधित विद्यार्थ्यांनी प्राप्त करून घ्यावी.

८) शिष्यवृत्तीची देय रक्कम विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीयकृत बँकेतील खात्यात जमा होत असल्यामुळे विद्याथ्यांनी प्रवेश घेत असतांनाच राष्ट्रीयकृत बँकेत स्वतंत्र खाते उघडून व आधार कार्ड लिंक करावे.

शिष्यवृत्ती मिळवून देण्याची महाविद्यालयाची जबाबदारी नाही. तर ती संबंधित विद्यार्थ्यांचीच राहील. कोणत्याही कारणासाठी शिष्यवृत्ती किंवा शुल्क सवलत अर्ज भरल्या न गेल्यास सबंधित विद्यार्थ्यास नियमानुसार दयावे लागणारे संपूर्ण शुल्क भरावे लागेल.

शिष्यवृत्ती फॉर्म सोबत आवश्यक कागदपत्राच्या सत्यप्रतिलिपी जोडणे आवश्यक राहील. विद्यार्थी आवश्यक असलेले कागदपत्रे जोडण्यास असमर्थ असेल तर अशा परिस्थितीत त्यांचा शिष्यवृत्ती फॉर्म सवलतीचा फॉर्म विद्यार्थ्याच्याच जबाबदारीवर महाविद्यालय स्विकारू शकेल. परंतु त्याला फॉर्म देतांनाच संपूर्ण वर्षाचे शुल्क भरावे लागेल. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

भारत सरकार शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादा :—

अ) अनुसूचित जाती आणि जमातीसाठी उत्पन्न मर्यादा रू. 2,50,000/- राहील.
ब) विमुक्त जाती/जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास वर्गीय विद्यार्थ्यांना उत्पन्न मर्यादा रू.1,50,000/- इतकी राहील.
क) शुल्क सवलत / Reimb of Fee :— वरील शिष्यवृत्तीच्या उत्पन्न मर्यादेपेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या विद्यार्थ्याला ही ही सवलत मिळू शकेल. संबंधित विद्यार्थ्यांनी श्री. दि. प. सलामे यांचेशी संपर्क साधावा.

सवलती :—

अ) राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना :— (आर्थिक मागास)
ब) महाराष्ट्र शासनाने निर्धारित केलेल्या रू.8,00,000/- उत्पन्न गटातील पालकांच्या पाल्यांनाच ह्या सवलतीचा लाभ मिळेल.
क) संबंधित विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
ड) या योजनेकरिता संबंधित विद्यार्थ्यांची डोमेसाईल सर्टीफिकेट आवश्यक आहे.
ई) पदवी किंवा पदव्यूत्तरला A.T.K.T. अंतर्गत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला ही सवलत मा. सहसंचालक (उच्च शिक्षण) नागपूर विभाग नागपूर, यांनी मान्यता दिल्यानंतरच मिळेल.
उ) उत्पन्नाचा दाखला (प्रमाणपत्र) मा. तहसिलदार यांच्या सहीचा असावा.
ऊ) फक्त पहिल्या दोन अपत्यांना राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती सवलत मिळेल.
ए) उत्पन्न लिहितांना मागील वर्षाचे (2024-25) उत्पन्न देणे आवश्यक राहील चालू वर्षाचे उत्पन्न दिल्यास अर्ज रद्द करण्यात येईल.
ऐ) आई—वडील जिवंत असतांना विद्यार्थ्याचे पालक किंवा स्वत: पालक म्हणून सही करू नये. सर्व प्रथम वडीलाची सही घ्यावी. वडील जिवंत नसतील तर आईची सही घ्यावी. आई—वडील दोघेही जिवंत नसतील तर पालकाची सही आणावी.
ओ) वडील किंवा आई मरण पावल्यास मृत्यु प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
औ) विद्यार्थ्यांनी अर्ज ऑनलाईन संपूर्ण माहितीसहित भरून कार्यालयात योग्य मुदतीच्या आत सादर करावे ही जबाबदारी सर्वस्वी विद्यार्थ्यांचीच राहील. वरील कारणाकरिता तसेच ७५% उपस्थिती नसल्यास अर्ज अस्विकृत झाल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही ह्यासाठी विद्यार्थ्याला पूर्ण वर्षाचे शुल्क भरावे लागेल.
अं) असे अर्ज महाविद्यालयात प्रवेश घेतल्यापासून १५ दिवसाचे आत सादर करायलाच पाहिजे.
अ:) फी माफीची सवलत मिळण्यासाठी आणि ही सवलत चालू राहावी म्हणून विद्यार्थ्यांची नियमित ७५% टक्के उपस्थिती, चांगली वर्तणूक व समाधानकारक प्रगती असणे आवश्यक आहे दर तिमाहीला एकंदर शैक्षणिक दिवसापैकी ७५% टक्के उपस्थिती असणे आवश्यक आहे. ही शेकडा ७५% टक्के उपस्थिती प्रत्येक महिन्यात व प्रत्येक विषयात असणे आवश्यक आहे. तरच फ्रिशीप, R.C.S.M.S.S. / शिष्यवृत्ती सवलत मिळेल.
क) कोणताही विद्यार्थी शिक्षणाबाबत रिकामा राहून खंड पडला असेल तर खंड प्रमाणपत्र (Gap Certificate) व त्याच्या दोन सत्यप्रती सादर करावे लागेल.
ख) पालकाचे रु.२,५०,०००पेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या अनुसुचित जाती, जमाती, विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सवलती.

पात्रता व अटी :—

अ) विद्यार्थी अनुसूचित जाती जमातीचा असावा.
ब) शिक्षणात खंड पडला असेल तर खंड प्रमाणपत्र (Gap Certificate) देणे आवश्यक आहे.
अनुसूचित जाती जमाती गटाच्या रू. २,५०,००० पेक्षा अधिक न असणाऱ्या विद्यार्थ्याचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र Declaration of Income & caste) गुणपत्रिका यांच्या एक प्रती जोडाव्या लागतील.
क) पालकाचे रु. १,५०,०००/—पेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या अनुसुचित वि.ज./भ.ज., विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सवलती
ख) विद्यार्थी, एन.टी., एस. बी.सी, ओ.बी.सी प्रवर्गाचा असावा.
ग) एन.टी., एस बी.सी., ओ.बी.सी., विद्यार्थ्यांकरीता डोमेसियल सर्टीफीकेट अनिवार्य आहे.
घ) एन. टी., एस. बी.सी., ओ.बी.सी गटाच्या रु. १,५०,०००/—पेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या विद्यार्थ्याचे उत्पनाचे प्रमाणपत्र, जातीचे अधिवास प्रमाणपत्र आणि गुणपत्रिका यांच्या एक एक प्रती जोडाव्या.

टिप :— एकदा महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर पुन्हा कोणत्याही कारणास्तव कोणतेही कागदपत्रे परत मिळणार नाही. वर्षाच्या शेवटी फक्त गुणपत्रिका मिळेल. मात्र कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती काढण्याकरीता रेकॉर्ड दाखविण्याचे ५० रु. लागतील. कोणत्याही अवस्थेत कार्यालयाचे बाहेर कागदपत्रे नेता येणार नाही. या संबंधात विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, शक्यतो प्रवेश घेण्याच्या अगोदर आपल्या मूळ कागदपत्रांच्या पुरेशा झेरॉक्स प्रती काढून घ्याव्यात व त्या साक्षांकित करून ठेवाव्यात.

मा.सहा.आयुक्त समाजकल्याण भंडारा यांचे दि.१४/०२/२०२४ च्या पत्रानुसार अनुसूचित जाती (SC) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना केंद्रसरकारकडून ६०% रक्कम विद्यार्थ्याच्या बँक खात्यामध्ये DBT पोर्टल द्वारे जमा होत असते. केंद्रसरकारकडून जमा झालेली ६०% रक्कम ही महाविद्यालयाचे शुल्क असते. करीता SC प्रवर्गातील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांनी केंद्रसरकारकडून जमा झालेली शिष्यवृत्तीमधून ६०% रक्कम महाविद्यालयास ७ दिवसाचे आत जमा करावे.

# समर्थ महाविद्यालय-प्रायोजित पारितोषिक - अ) पदवी वर्गासाठी

| क्र. प्रायोजक | प्रायोजन | ठेवराशी | लाभार्थी |
|---|---|---|---|
| १) स्व. श्री. बाळकृष्णराव खानोरकर, लाखनी | स्व. उल्हास बाळकृष्णराव खानोरकर स्मृती | ५००/— | बी.ए. अन्त्य परीक्षेत प्रथम येणाऱ्यास |
| २) डॉ. अजय अनंतराव खानोरकर, अकोला | स्व.श्रीमती राधाबाई खानोरकर, अकोला स्मृती | १५००/— | बी.ए. अन्त्य परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम आलेल्या शिक्षक किंवा शेतकऱ्याच्या मुलीस |
| ३) डॉ. अजय अनंतराव खानोरकर, अकोला | स्व.श्रीमती राधाबाई खानोरकर, अकोला स्मृती | १५००/— | बी. कॉम. अन्त्य परीक्षेत शिक्षक किंवा शेतकऱ्याच्या पाल्यास (मुलगा किंवा मुलगी) |
| ४) श्री. अजय अनंतराव खानोरकर, अकोला | स्व.श्री.लक्ष्मणराव खानोरकर, अकोला स्मृती | १५००/— | बी.ए. अन्त्य परीक्षेत इंग्रजी विषयात प्रथम आलेल्यास |
| ५) प्रा. आनंदराव द. खोलकुटे, लाखनी | स्व.सौ.अंजलीदेवी खोलकुटे, नागपूर स्मृती | ३०००/— | बी.ए. अन्त्य परीक्षेत गृहअर्थशास्त्र विषयात सर्वाधिक गुण प्राप्त मुलीस |
| ६) श्री मोहनराव प. भांडारकर, लाखनी | स्व.सौ.इंदिराबाई लाखनीकर स्मृती | ३०००/— | बी.ए. अन्त्य परीक्षेत गृहअर्थशास्त्र विषयात सर्वाधिक गुण प्राप्त मुलीस |
| ७) श्री विजयराव देशमुख, नागपूर. | श्री समर्थ रामदास स्वामी स्मृती | ११११/— | बी.ए. अन्त्य परीक्षेत इतिहास विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्यास |
| ८) प्रा. अरूण ना. कडबे, लाखनी | स्व.बाळकृष्ण नारायणराव कडबे स्मृती | १०००/— | बी.ए. अन्त्य परीक्षेत संस्कृत विषयात प्रथम येणाऱ्यास |
| ९) प्रा. अरूण ना. कडबे, लाखनी | स्व.बाळकृष्ण नारायणराव कडबे स्मृती | १०००/— | बी.ए. अन्त्य परीक्षेत इंग्रजी वाङमय विषयात प्रथम येणाऱ्या |
| १०) प्रा. सत्यवान शं. मेश्राम, नागपूर | स्व.शंकरराव हरिभाऊ मेश्राम कनेरी स्मृती | ११११/— | बी.ए. अन्त्य मध्ये मराठी वाङ्‌मय विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्यास |
| ११) श्री भगवंतराव सोनवाणे, जळगाव | श्री भगवंतराव सोनवाणे, जळगाव | १०००/— | बी. कॉम. परीक्षेत प्रथम येणाऱ्यास |
| १२) श्री. युनूसभाई हाजी सुलेमान आकबाणी लाखनी | पै.हाजी गणी खनून हाजी सुलेमान आकबानी, लाखनी | १५००/— | बी.ए. अन्त्य परिक्षेत गृहअर्थशास्त्र विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्यास |
| १३) श्रीमती विनिताताई अनिल सोमन | स्व.प्रा.अनिल वासुदेव सोमन स्मृती | २५०० /— | बी.कॉम. अन्त्य परीक्षेत प्रथम येणाऱ्यास |
| १४) डॉ. गो. नि. हडप नागपूर. | स्व.सौ.मंजुषा मनोहरराव हडप स्मृती | २०००/— | बी. कॉम. अन्त्य परीक्षेत प्रथम येणाऱ्यास |
| १५) डॉ. गुरुप्रसाद गोविंदराव पाखमोडे, लाखनी | श्री.गोविंदराव लक्ष्मणजी पाखमोडे, मुरमाडी/लाखनी | ५००० /— | बी.ए. अन्त्य परीक्षेत प्रथम येणाऱ्यास. |
| १६) मा. सेवकजी वाघाये (माजी आमदार साकोली विधानसभा क्षेत्र) | श्रीमती लक्ष्मीबाई वाघाये यांचे नावे | ११००० /— | बी.ए.अन्त्य परीक्षेत प्रथम येणाऱ्यास |
| १७) मा. सेवकजी वाघाये (माजी आमदार साकोली विधानसभा क्षेत्र) | श्रीमती लक्ष्मीबाई वाघाये यांचे नावे | ५००० /— | प्रोत्साहनपर बक्षिसे |
| १८) मा. भानुदासजी वंजारी (से. नि. अधि. स.म. लाखनी) | श्री.गोविंदराव लक्ष्मणराव वंजारी पारितोषिक | २००० /— | बी.ए.३मधून संस्कृत विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्यास |
| १९) श्री. बाबुभाई आकबानी लाखनी यांच्या तर्फे | कु.अश्मा बाबुभाई आकबानी हिच्या नावे | २५०० /— | बी.ए. ३मधुन इंग्रजी विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्यास |
| २०) श्रीमती विनिताताई अनिल सोमन | स्व.प्रा.अनिल वासुदेव सोमन स्मृती | २५०० /— | महाविद्यालयातील अष्टपैलू विद्यार्थ्यांसाठी अ) किमान ४५ टक्के गुण, ब) सांस्कृतिक कार्यक्रमात विशेष प्राविण्य, क) विद्यापीठ मैदानी स्पर्धेत सहभाग, ड) रा.से.यो. विशेष पुढाकार |
| २१) प्रा.ज्ञानेश्वर भेजनाथ पटले, सालेभाटा | स्व.प्रमिलाताई भेजनाथ पटले गुरुजी | ५००० /— | बी.ए. अन्त्य मधून ओ.बी.सी. प्रवर्गातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थीनीस |
| २२) डॉ.अल्काताई सोरदे | ठेव पारितोषिक | ५०००० /— | सदर पारितोषिके मराठी विषयात सर्वाधिक गुण घेणाऱ्या पहिल्या व दुसऱ्या विद्यार्थ्यास प्रत्येक विद्याशाखेत प्रत्येक वर्गासाठी दिली जातील. |
| २३) श्री.जयकृष्ण फेंडरकर | स्व.श्रीरामजी फेंडरकर यांचे स्मृती प्रित्यर्थ | ५००० /— | बी.ए. भाग १ मधून सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्यास. |
| २४) श्री.मारोतीजी जवंजार, नागपूर | संस्थापक/अध्यक्ष बेरार फायनान्स, नागपूर यांच्या तर्फे | १००००० /— | बी. कॉम, I, II, III, M-Com-I, II प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास |
| २५) प्राचार्य डॉ.दिगांबर दत्तात्रय कापसे | मुख्याध्यापक स्व.दत्तात्रय विठोबा कापसे स्मृती प्रित्यर्थ | ५००० /— | बी. ए. अंत्य परिक्षेत इतिहास विषयात सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थी |

# ब) पदव्युत्तर वर्गासाठी

| क्र. प्रायोजक | प्रायोजन | ठेवराशी | लाभार्थी |
|---|---|---|---|
| १) श्री. बाबुभाई आकबानी लाखनी | पै.हाजी सत्तार हाजी सुलेमान आकबानी स्मृती | १५००/— | एम.ए. अंत्य (मराठी) परीक्षेत प्रथम येणाऱ्या मुलास |
| २) श्री. बाबुभाई आकबानी लाखनी | पै.हाजी सत्तार हाजी सुलेमान आकबानी स्मृती | १०००/— | एम.ए. अंत्य (मराठी) परीक्षेत प्रथम येणाऱ्या मुलीस |
| ३) श्री.आ.द.खोलकुटे (माजी कार्यकारी प्राचार्य) | स्व.केशवसुत स्मृती प्रित्यर्थ | १५००/— | एम.ए. अंत्य परीक्षेत प्रथम येणाऱ्यास |
| ४) श्री. प्रमोदकुमार शुक्ला (मुरमाडी/सावरी) | स्व.सौ.कल्पना प्रमोद शुक्ला स्मृती प्रित्यर्थ | २०००/— | एम.ए. अंत्य (संस्कृत) परीक्षेत प्रथम येणाऱ्यास |

## :: उपस्थिती संबंधी नियम ::—

अ) महाविद्यालयात विद्यार्थ्याने कोणत्याही महिन्यात प्रवेश घेतला तरी प्रत्येक विषयाच्या शैक्षणिक तासाला १०० टक्के (Period) उपस्थिती असणे अपेक्षित राहील. परीक्षेकरीता किमान ७५टक्के उपस्थित असणे आवश्यक आहे. नसल्यास परीक्षेचा फॉर्म भरता येणार नाही. तसेच परीक्षेला बसता येणार नाही.

ब) परवानगी न घेता अनुपस्थित राहिल्यास प्रत्येक तासाला १रु. दंड आकारण्यात येईल. आजारपणा निमित्ताने अनुपस्थित राहत असल्यास वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आजारपणाच्या काळात सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा नंतर दिलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. आजारपण, रा.से.यो. शिबीर, क्रीडा स्पर्धा निमित्त बाहेरगावी जाणे यासाठीच क्षम्य समजली जाईल.

क) उपस्थितीचा हिशेब खालील दोन सेमिस्टर पध्दतीने होईल.

१) जुलै ते नोव्हेंबर —२०२५ २) डिसेंबर ते एप्रिल २०२६ ज्या विद्यार्थ्याची उपस्थिती सेमिस्टर पध्दतीत कमी राहील. त्याचे शिक्षण शुल्क त्या विद्यार्थ्यांना भरावे लागेल. किंवा त्याला शिष्यवृत्ती रकमेचे वाटप होणार नाही. अन्यथा त्याचे नाव महाविद्यालयातून काढून टाकले जाईल. या बाबतीत पालकाशी कोणताही वेगळा पत्र व्यवहार केला जाणार नाही. उपस्थितीबाबत विद्यार्थी व पालकाचीच स्वत:ची जबाबदारी राहील.

## —:: परीक्षा संबंधी नियम ::—

महाविद्यालयीन परीक्षेसाठी वेळोवेळी स्वतंत्र सूचना लावण्यात येतील विद्यापीठ परीक्षेला बसण्यासाठी विद्यापीठाने ज्या पात्रता, अटी निश्चित केल्या आहेत त्या विद्यार्थ्याला पूर्ण कराव्या लागतील. (उदा. वर्गातील ७५ टक्के उपस्थिती, शारीरिक शिक्षणातील ८० टक्के उपस्थिती तसेच (N.S.S.) मधील ८० टक्के उपस्थिती याशिवाय शारीरिक क्षमता परीक्षेतील व वैद्यकीय तपासणीमधील उपस्थिती आवश्यक समजली जाते. विद्यापीठाने ह्या किंवा इतर कोणत्याही कारणास्तव परीक्षा आवेदन नामंजूर केल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

## —:: विद्यार्थी सहायता निधी ::—

या निधीतून विद्यार्थ्यांना गुण, पात्रता व आर्थिक गरज व आकस्मिक संकट या आधारावर आर्थिक सहायता दिली जाते. जे मागील परीक्षा उत्तीर्ण होवून वरच्या वर्गात जातील त्याच विद्यार्थ्यांनी प्रवेश देण्याची अंतिम तिथी संपल्यानंतर १५दिवसाचे आत अर्ज करावयाचा आहे. हयासाठी वेगळी सूचना दिली जाणार नाही. या निधीच्या वितरणासाठी दरवर्षी एक समिति नियुक्त केली जाते व मा. प्राचार्य हे समितीचे अध्यक्ष असतात.

## —: शुल्कासंबंधी नियम :—

१) एखाद्या पुर्ण फी धारक विद्यार्थ्याने महाविद्यालयात प्रवेश घेतला की, त्या सत्राचे शिक्षण शुल्क व इतर पूर्ण शुल्क द्यावे लागेल.

२) सर्व प्रकारची बाकी रक्कम दिल्यानंतर विद्यार्थ्याचे परीक्षेकरीता प्रवेश आवेदन पत्र विद्यापीठाकडे पाठविता येईल.

३) एखादा विद्यार्थी कोणत्याही कारणास्तव विद्यापीठ प्रवेशाच्या अंतिम तिथिनंतर महाविद्यालय सोडून गेल्यास त्याला त्याने दिलेले पैसे तर परत मिळणार नाही उलट त्याने संपूर्ण वर्षाचे शुल्क दिल्याशिवाय कोणत्याही प्रकारचे प्रमाणपत्र त्यास मिळू शकणार नाही.

Duplicate T.C. Bonafied Certificate Duplicate Icard

प्रवेश घेतल्यानंतर कागदपत्रे तात्पुरते देण्यासाठी शुल्क आकारले जातील.

विशेष सूचना :— शुल्क, निधी, सवलती व अभ्यासक्रम यात सत्रामध्ये काही बदल झाल्यास तो वेळोवेळी सूचित करण्यात येईल व तो विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील.

## —:: अन्य महत्वाच्या सूचना ::—

१) उशीरा प्रवेश व अभ्यास शाखा बदल: नागपूर विभागीय बोर्ड/शिक्षणाधिकारी अथवा नागपूर विद्यापीठ यांनी ठरवून दिलेल्या अंतिम प्रवेश तिथीनंतर महाविद्यालयात प्रवेश केवळ संबंधीत अधिकाऱ्यांच्या लेखी संमतीनंतरच जागा शिल्लक असल्यास होऊ शकेल. तथापि असा प्रवेश देणे महाविद्यालयास बंधनकारक नाही. उशिरा प्रवेश, उशीरा फॉर्म सादर करणे, विषय बदल, महाविद्यालय स्नेह मेळावा, परीक्षा, सायकल स्टेंड व सर्व शुल्कात समाविष्ट असलेल्या उपक्रमांशी इ. साठी अतिरिक्त शुल्क आकारले जाऊ शकेल.

परीक्षा फॉर्म भरण्याच्या वेळी ७५टक्के पेक्षा कमी उपस्थिती असल्यास फॉर्म/फी महाविद्यालय स्विकारणार नाही. काही विशिष्ट परिस्थितीत पालकांनी स्वत: प्राचार्यांना भेटून विनंती अर्ज सादर केल्यास बाब विचारार्थ घ्य घेतली जाईल. अंतिम प्रवेश तिथीनंतर अभ्यास शाखा बदलविता येणार नाही. शाखा बदल करावयाचा झाल्यास जास्तीचे शुल्क आकारले जाईल. अंतिम प्रवेश तिथी पूर्वी आवश्यक अटी पूर्ण कराव्या लागतील. या उशिरामुळे उपस्थिती कमी पडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी विद्यार्थ्यावर राहील. जागा असल्यासच शाखा बदलाचा विचार होऊ शकेल.

२) दंड :— गैरवर्तणूक इत्यादी गोष्टीसाठी मा. प्राचार्य संबंधित विभाग प्रमूखाच्याध्याध्यापकांच्या सल्यानुसार दंड करू शकतील अशा कारणास्तव आकारलेल्या दंडास कोणतीही सुट मिळणार नाही. विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना भूर्दंड बसणार नाही अशी काळजी घ्यावी. आवश्यकतेनुसार एखाद्या द्य विद्यार्थ्याच्या वर्तनासंबंधी पालकाकडून लेखी हमी रक्कम अमानत म्हणून आकारली जाते.

रा.से. योजना शिबिरालाध्क्रीडा स्पर्धेसाठीध्विविध स्पर्धासाठी तेवढ्य काळाची अनुपस्थिती क्षम्य समजली जाईल. हयासाठी विभाग प्रमुखामार्फत अर्ज करावा.

३) निलंबन (Expulsion): विद्यार्थ्यांनी नियमांचे काटेकोरपणे पालन करावे आणि प्राचार्य, प्राध्यापक, ग्रंथपाल व महाविद्यालयातील इतर कर्मचारी यांच्याशी व परस्पराशी सुध्दा सभ्यतेने वागावे. पूर्वसत्रांत ज्या विद्यार्थ्याच्या वर्तनाबाबत तक्रारी होत्या त्यांना पालक सभेच्या पदाधिकाऱ्याचे शिफारस पत्र आणावे लागेल व द्य पालकाचे लेखी हमी पत्र सादर करावे लागेल. तरच प्रवेशाचा विचार करता येईल.

४) माहिती पुस्तिकेतील बदल प्राचार्यांना प्रसंगानुरूप माहितीत बदल, सुधारणा किंवा दुरूस्ती स्वतंत्र सूचना काढून करता येईल याची नोंद घ्यावी.

## —:: महत्वपूर्ण सूचना ::—

विश्व विद्यालय अनुदान आयोग नवी दिल्ली च्या फेब्रुवारी २००८च्या पत्रक्रमांक No- F1 B/2006 (CPP)= # अनुसार) तसेच सर्वोच्च न्यायालय भारत सरकार च्या खटला क्र. २४२९५/२००४ च्या निर्णयानुसार विद्यार्थ्यांची रॅगिंग घेणे (कोणत्याही प्रकारचा शारीरिक किंवा मानसिक छळ करणे हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा असून असा गुन्हा कोणत्याही विद्यार्थ्यांच्या हातून घडल्यास त्याला त्याचे स्पष्टीकरण लेखी देण्याची संधी देण्यात द्य देण्यात येईल व हे स्पष्टीकरण समाधानकारक आढळून न आल्यास अशा विद्यार्थ्यावर महाविद्यालयाकडून काढून टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

Warning If any incident of ragging comes to the notice of the authority the concerned Student shall be given liberty to explain and if his explanation is not satisfactory the I authority would expell him from the institution.

## शैक्षणिक वेळापत्रक सत्र २०२५—२६

१) शैक्षणिक वेळापत्रकासबंधी सुधारित माहिती विद्यापीठाकडून प्राप्त झाल्यावर महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावली जाईल.

२) महाविद्यालयात अंतर्गत मूल्यमापनासाठी वर्षातून चार घटक चाचण्या घेण्यात येतात.

टिप :— वरील परीक्षांच्या कालावधीकरीता परिस्थितीनुसार बदल करण्याचा प्राचार्याचा निर्णय अंतिम राहील. घटक चाचण्यासंबंधीच्या सूचना फलकावर लावण्यात येतील.

सर्व विद्यार्थ्यांनी विद्यापीठ गीत पाठ करावे.

N.S.S. ची प्रार्थना: 'खरा तो एकच धर्म' सर्व विद्यार्थ्यांनी पाठ करावे.

# ग्रंथालय

अ) विद्यार्थ्यांकरिता ग्रंथालय नियमावली:—

१) ग्रंथालयातील पुस्तकाची माहिती विद्यार्थ्यांनी चिठ्ठीद्वारे करावी. पुस्तकाची मागणी करतांना मागणी पत्रिकेत पुस्तकावा वर्गांक (Classification No.), दाखल अंक (Accession No.), वर्गीकृत तालिकेच्या वा कार्ड कॅटलॉग (ब्तक ब्ंजंसवहनम) सहाय्याने लिहा. (Card Catalogue) चा उपयोग करतांना त्याची नासधूस होता कामा नये अन्यथा संबंधित विद्यार्थी दंडास पात्र राहील.

२) प्रत्येक विद्यार्थ्याला पाठ्य पुस्तके व अवांतर प्रत्येकी एकेकच पुस्तक मिळेल. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वत: चेच सभासद तिकीट वापरणे आवश्यक आहे. दुसऱ्याच्या सभासद तिकीटावर पुस्तके मिळणार माहीत. पुस्तके आठदिवसातच परत करावी लागतील. या अवधीनंतर जर पुस्तक विद्यार्थ्याने ठेवले असेल तर प्रत्येक पुस्तकामागे दर दिवसाकरिता घ रू. दंड आकारण्यात येईल. पुस्तके परत करतांना वारंवार उशीर करणाऱ्या विद्यार्थ्यांचा ग्रंथालयातून पुस्तके नेण्याचा अधिकार देखील काही, काळ स्थगित करण्यात येईल.

३) एखादे पुस्तक हरविले असल्यास त्या संबंधीची माहिती ग्रंथपालाला त्वरित देण्यात यावी ही माहिती ज्या दिवशी देण्यात येईल, त्या दिवसापासून दहा दिवसाचा वेळ नवीन पुस्तक घेऊन परत करण्याकरिता मिळेल व या काळात दंड आकारण्यात येणार नाही. हरविलेल्या पुस्तकाऐवजी नवीन पुस्तक जर दहा दिवसात देण्यात आले नाही तर पुस्तकाच्या किमतीच्या दुप्पट रक्कम वसुल करण्यात येईल. हरविलेले पुस्तक दुर्मिळ किंवा विशेष महत्वाचे असेल तर जास्त रक्कम देखील वसूल केली जाईल

४) प्रत्येक विद्यार्थ्याला दोन सभासद तिकिटे देण्यात येतील. एक पाठ्य पुस्तकाकरिता (लाल अक्षरात) दुसरे अवांतर पुस्तकाकरिता (निळया अक्षरात) पुस्तक घेतांना सभासद तिकिटे ग्रंथालयात धावे व परत करतांना तिकिटे परत मागावी. तिकिटाच्या अभावी पुस्तक देण्यात येणार नाही महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर एक महिन्याचे आंत प्रत्येक विद्याव्यनि ग्रंथालय सभासद तिकिटे बनविणे आवश्यक आहे. हे सभासद तिकीट हरविल्यास ते ताबडतोब ग्रंथपालाच्या लक्षात आणून द्यावे. डुप्लिकेट सभासद तिकीट १०रू.—/ भरून तयार करता येईल.

५) ग्रंथालयातून दिलेली पुस्तके आवश्यकता भासल्यास ठरलेल्या कालावधीच्या अगोदर देखील परत मागविण्यात येतील अशावेळी पुस्तक परत करण्यात आले नाही तर विद्यार्थी दंडास पात्र ठरेल.

६) संदर्भ व राखीव विभागातील ग्रंथ ग्रंथालयाबाहेर नेता येणार नाहीत. अन्यथा दंड करण्यात येईल व सभासद तिकिट रद्द करण्यात येईल. ही पुस्तके परिचय पत्रावर ग्रंथालयातच वाचावयास मिळतील.

७) ग्रंथालयातील पुस्तक ज्या व्यक्तीने नेले असेल ती व्यक्ती पुस्तके चांगले ठेवण्यासंबंधी व ग्रंथालयात नियमानुसार परत करण्यासंबंधी जबाबदार धरले जाईल.

८) ग्रंथालयातून घेतलेल्या पुस्तकांची पाने काढली किंवा कापली आहेत किंवा ते अन्य प्रकारे खराब करण्यात आले आहे. तसे आढळून आल्यानंतर ते वापरून परत करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यासंबंधी त्त) *) जबाबदार धरण्यात येईल. त्या संबंधी इतर चौकशी करण्यात येणार नाही. प्रत्येक विद्यार्थाने ग्रंथालयातून पुस्तक घेतांना ते बांगले आहे किंवा नाही ते पाहावे. पुस्तकाची पाने गहाळ झाली असतील कंवा कापली असतील तर ती बाब त्याने ग्रंथपालाच्या नजरेस पुस्तक घेतेवेळीच आणावी व ग्रंथालयाचा त्यावर शिक्का मारून घ्यावा. नंतर कोणतीही उजर ऐकली जाणार नाही. घञ) नेलेला ग्रंथ ठेवून घेण्याची मुदत संपल्यानंतर देखील अधिक काळ पाहिजे असेल तर तो ग्रंथ ग्रंथालयात आणून पून्हा आपल्या नावावर नोंदवून नेता येईल. दुर्मिळ ग्रंथ असल्यास ही सोय उपलब्ध

९) कोणताही एखादा ग्रंथ धरी वाचावयास नेण्यासाठी परवानगी देण्याचा अधिकार ग्रंथपालाला आहे.

१०) नेलेला ग्रंथ ठेवून घेण्याची

११) कोणत्याही ग्रंथावर काही लिहू नये. किंवा त्यावर खुणा करू नयेत. अन्यथा संबंधित विद्यार्थ्यांवर दंड आकारला जाईल.

१२) एखादा ग्रंथ अनेक खंडात किंवा विभागात प्रसिध्द झालेला असतो. अशा ग्रंथाचा एखादा ग्रंथखंड किंवा भाग गहाळ झाला तर सहसा त्याचा एकच खुटा खंड किंवा भाग मिळणे कठीण जाते. अशावेळी सुटा भाग न मिळाल्यास त्या ग्रंथाच्या सर्व खंडाची व भागाची म्हणजे पूर्ण संचाची किंमत वाचकाला भरपाई करून द्यावी लागेल.

१३) प्रत्येक विदयार्थ्याने वार्षिक परीक्षेच्या तीन दिवस अगोदर ग्रंथालयाची सर्व पुस्तके परत करणे व ग्रंथालयाचे नादेय प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय परीक्षेचे प्रवेशपत्र मिळणार नाही.

१४) इतरांना उपसर्ग पोचेल अशा मोठ्या आवाजात ग्रंथालयात बोलता येणार नाही. वाचन कक्ष केवळ वाचन ६ लेखन व्यवहारासाठी आहे हे लक्षात घ्यावे.

प्रत्येक विद्याव्यानि वार्षिक परीक्षेच्या तीन दिवस अगोदर ग्रंथालयाची सर्व पुस्तके परत करणे व ग्रंथालयाचे नादेय प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय परीक्षेचे प्रवेश पत्र मिळणार नाही.

१५) ग्रंथपालाच्या पूर्व परवानगीशिवाय ग्रंथ भांडारात कुणालाही प्रवेश करता येणार नाही ग्रंथालयात व वाचनालयात येतांना प्रत्येक विद्यार्थाने स्वत:चे चालू शैक्षणिक वर्षातील महाविद्यालय ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक आहे. अन्यथा वाचनालयात व ग्रंथालयात प्रवेश करता येणार नाही.

१६) प्रसंगानुसार नियमात बदल करण्याचा अधिकार मा. प्राचार्यांना आहे. सूचनाफलकावर वेळोवेळी दिलेल्या सूचनाचे काटेकोरपणे पालन करावे वरील कोणत्याही नियमाचे विद्यार्थ्यांकडून उल्लंघ झाल्यास त्या विद्यार्थ्याला ग्रंथालयात प्रवेश नाकारण्याचा वा पुस्तकांची देवघेव यांबविण्याचा अधिकार ग्रंथपालाला आहे.

ब) ग्रंथपेढी — विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मदतीने गरीब होतकरू विद्यार्थ्यांची क्रमिक पुस्तकांची गरज भागविण्यासाठी ग्रंथपेढी सुरू करण्यात आलेली आहे. ग्रंथपालाशी संपर्क साधून गरजुंनी नियम माहित करून या योजनेवा फायदा घ्यावा.

क) वाचनालय— विद्यार्थ्यांना रिकाम्या वेळात अवांतर वाचनासाठी प्रशस्त वाचनकक्षाची सोय आहे. निरनिराळ्या विषयावर दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, व मासिके उपलब्ध असतात. त्याच्या वापरासंबंधी नियम समजावून घ्यावे व त्याचा फायदा घ्यावा अशी अपेक्षा आहे.

विशेष सूचना: —

अ) कोणत्याही ग्रंथाचे किंवा वाचन साहित्याचे झेरॉक्स, ग्रंथपालांच्या परवानगी शिवाय करता येणार नाही.

ब) जे साहित्य उपलब्ध करून देण्यात आले त्याची विद्यार्थ्याने जाणूनबुजुन नासधूस केली तर दंड आकारण्यात येईल. अधिक माहीतीसाठी ग्रंथपालाशी संपर्क साधावा.

क) ग्रंथालयात प्रवेश केल्यानंतर तेथील हजेरीवर सही करणे आवश्यक आहे.

## —:: विशेष महत्त्वाची सूचना ::—

महाविद्यालयात विद्यापीठाने निर्धारित केलेल्या शुल्काष्यतीरिक्त जे नमूद केले आहे ते वगळून अन्य कोणतेही अतीरिक्त शुल्क आकारल्या जात नाही. परंतु राष्ट्रीय शिक्षण संस्था लाखनीने घालून दिलेल्या पूर्वापार हिशेब पद्धतीनुसार महाविद्यालयाच्या विकासार्थ विविध स्त्रोतांतून निधी उभारला जातो. यात शिस्तपालनार्थ दंड स्वरूपात महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्याकडून घेतला जाणारा निधी, तसेच पुन्प्रवेशार्थी विद्यार्थ्यांसंबंधीचे महाविद्यालय विकारा सहयोग निचीचे धोरण वा अन्य स्त्रोतांमधून प्राप्त होणाऱ्या रकमा या सर्वांचा हिशेब राष्ट्रीय शिक्षण संस्था Management Account मध्ये समाविष्ट करण्याची पूर्वापार पद्धती आहे.

तसेच महाविद्यालयाची विज्ञान विद्याशाखा ही कायम विना अनुदानित असून बॉयोटेक्नॉलॉजी ग्रुप चालविणारे समर्थ महाविद्यालय हे भंडारा जिल्हयातील एकमात्र महाविद्यालय आहे. या ग्रुपला प्रवेश घेणाऱ्यांकडून सदर ग्रुपसाठी आवश्यक सुविधा उभारण्यास्तव फक्त प्रथम वर्ष प्रवेशाचे वेळी रु. ५०००/— विद्याशाखा विकासनिधीची तरतूद केली आहे. सदर निधीसुद्धा महाविद्यालयाच्या विकास निधीच्या अंतर्गत हिशेबात समाविष्ट असतो याची नोंद घ्यावी.

## —:: अन्य उपक्रम ::—

१) राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) :— विद्यार्थ्यांमध्ये श्रमाची प्रतिष्ठा वाढावी म्हणून आर्थिक, सामाजिक व अन्य कार्यक्रम आयोजित केले जातात. दरवर्षी श्रम संस्कार शिबिर आयोजित केले जाते. यात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी १९९८—९९ सत्रापासून १० अतिरिक्त गुण देण्याची पध्दती सुरू झाली आहे. विद्यार्थ्यांनी घेतलेला सहभाग, वर्तणूक, उपस्थिती, कार्यतत्परता या सर्वांचा विचार करून सदर गुण दिले जातात. त्याचा विद्यापीठ परीक्षेत उपयोग होतो. कार्यक्रम दुपारी ३.०० नंतरच होतील. कार्यरत आहे. आपले पथक विद्यापीठातील सर्वोत्कृष्ठ पथकांपैकी एक आहे.

२) राष्ट्रीय छात्रसेना (National Cadet Corp) :— महाविद्यालयात अनेक वर्षांपासुन एन. सी. सी. पथक पथकामध्ये मुले आणि मुली मिळून १०८ विद्यार्थ्यांची निवड केल्या जाते. एन.सी. सी. विभागातर्फे सर्व विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या स्तरावरील शिबीरांमध्ये पाठविल्या जाते. उत्कृष्ठ कैडेटस्ला आवश्यक ते मार्गदर्शन करून पुढे जाण्यास प्रोत्साहित केले जाते. आमच्या एन.सी.सी. पथकातील अनेक माजी कॅडेटस् पोलीस दल आणि सशस्त्र दलांमध्ये सेवा देत असून महाविद्यालयाचा लौकीक वाढवित आहेत. सदर विभागाचे प्रमुख प्रा. बा. का. रामटेके हे आहेत.

३) आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग:— महाविद्यालयात निरंतर प्रौढ शिक्षण व लोकसंख्या मंडळ कार्यरत आहे. या द्वारे निरंतर प्रौढ साक्षरता अभियान व जाणीव जागृती केली जाते. यात सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या निर्देशानुसार गुण दिले जातात. त्यासाठी उपस्थिती, सहभाग, कार्यतत्परता व वर्तणुकीचा विचार केला जातो. कार्यक्रम दुपारी ३.००नंतरच होतील.

४) बौद्धिक व सांस्कृतिक विभाग :— विद्यापीठ कायद्यानुसार प्रतिनिधी मंडळात बौद्धिक व सांस्कृतिक गुणवत्तेच्या आधारावर प्रतिनिधी निवडण्याची पध्दत १९९६—९७ सत्रापासून सुरु झाली आहे. गीतगायन स्पर्धा, वादविवाद, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, विद्यापीठ आंतरविद्यापीठ व आंतरमहाविद्यालय स्तरावर भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यालाच प्रतिनिधीत्व मिळते. विद्यार्थ्यांची बौद्धिक व सांस्कृतिक गुणवत्ता वाढावी म्हणून या विभागाद्वारे विद्यार्थ्याला सहभागी केले जाते. यात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी विद्यापीठाच्या निर्देशानुसार गुण दिले जातात.

५) शारीरिक शिक्षण (Physical Education):— या विभागाद्वारे विभिन्न देशी विदेशी खेळाविषयी विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण केली जाते. या विभागासंबंधीच्या सूचना व नियम महाविद्यालय सुरू झाल्यानंतर फलकावर लावण्यात येतात. विद्यार्थ्यांनी संबंधीत विभाग प्रमुख प्रा. ध. पां. गिन्हेपुंजे याचेशी संपर्क साधावा.

६) वैद्यकीय तपासणी :— महाविद्यालय ठरविल त्या तारखांना त्या विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी होते. विद्यापीठ Ordinance No-34 अनुसार ह्या परीक्षेत अनुपस्थित राहिल्यास दंड आकारण्यात येईल.

७) संस्कृत संस्कार केंद्र:— संस्कृत संस्कार केंद्र १९९१—९२ सत्रापासुन सुरू करण्यात आले असून त्या केंद्रामार्फत पुढील उपक्रम घेण्यात येतात. १) संस्कृत अभ्यासक्रम २) पाठांतर वर्ग ३) निबंधस्पर्धा ४) व्याख्यानाचे आयोजन, व्याख्यानाच्या माध्यमातून, 'संस्कृत ग्रंथकार' आणि त्यांचे ग्रंथ, यांचा परीचय विद्यार्थ्यांना करून देणे हे केंद्राचे उदिष्ट आहे.

८) समर्थ स्टडी सर्कल :— महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे निरनिराळया मार्गदर्शक पुस्तकांची / स्पर्धा परीक्षेच्या पुस्तकाची सोय करण्यात आली आहे. ह्या संबधी डॉ. गभणे (ग्रंथपाल) यांचेकडे संपर्क साधावा.

९) अर्चना :— दरवर्षी महाविद्यालयातून ''अर्चना'' वार्षिकांकाचे प्रकाशन होत असते. वार्षिकांकासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून वेगवेगळ्या क्षेत्रासंबधी लेख मागवून प्रकाशित केले जातात. वार्षिकांकासाठी महाविद्यालयात स्वतंत्र समिती स्थापन केलेली आहे.

१०) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र :— शैक्षणिक क्षेत्र २०१०—११ पासून महाविद्यालयात स्पर्धा परीक्षांची मार्गदर्शन केंद्र सुरु झाले असून सदर मार्गदर्शन केंद्राचे प्रमुख — प्रा. डॉ. धनंजय गभणे

## —:: विद्यार्थी विकास विभाग ::—

१२) करिअर कट्टा :— मा. सहसंचालक उच्चशिक्षण नागपूर यांच्या दि.१०/०६/२०२२ च्या पत्र क्र. उ.शि.नाग. / आस्था/करिअर कट्टा/३४१६/२०२२ नुसार महाविद्यालयात करिअर कट्टा हा उपक्रम राबविण्यात येते. सदर उपक्रमात सहभागी होण्यासाठी माहितीपुस्तीके शोबत दिलेल्या नोंदणी फार्म मध्ये सर्व माहिती अचुकपणे भरून महाविद्यालयात प्रवेश घेतेवेळी सादर करावी. प्रा. डॉ. संदीपकुमार सरैय्या

१३) Career Katta (करिअर कट्टा):— करिअर कट्टा' हा महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्य केंद्र (MITSC) आणि महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आला आहे. मूल्यवर्धित कुशल मानवी संसाधने प्रदान करणे, हे त्याचे ब्रीदवाक्य आहे. तरुणांमध्ये उद्योजकीय कौशल्ये विकसित करण्यासाठी 'उद्योजक आपल्या भेटीला' सुरू केले आहे आणि नोकरदार आणि अधिकारी बनवण्यासाठी 'आयएएस आपला भेटीला' सुरू करण्यात आला आहे. त्याच्या यूट्यूब चॅनलद्वारे व्हिडिओ लेक्चर विनामूल्य प्रदान केले जाते.

१४) Career Guidance Cell (करिअर मार्गदर्शन कक्ष) :— करिअर मार्गदर्शन आणि समुपदेशन कॉलेजमध्ये 'करिअर मार्गदर्शन आणि समुपदेशन सेल' आहे. हे विद्यार्थ्यांना प्रवेशाच्या वेळी अभ्यासक्रम आणि विषयांच्या निवडीबाबत मार्गदर्शन करते आणि पुढील अभ्यासाचे मार्ग करिअर आणि त्यासाठी तयारी करण्याच्या पद्धती निवडण्याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थ्यांना अडचणीच्या काळात समुपदेशनही केले जाते. करिअर मार्गदर्शन कक्ष विद्यार्थ्याँना भारतातील उच्च शिक्षण आणि नोकरीच्या संधीसाठी मार्गदर्शन प्रदान करते, MPSC, UPSC, FOREST, POLICE, BANK इत्यादी स्पर्धात्मक परीक्षा घेण्यासाठी समुपदेशन आणि प्रशिक्षण कार्यक्रम दिले जातात. सल्लागार आमच्या कॅम्पसला भेट देतात आणि स्पर्धात्मक परीक्षांसाठी विविध प्रशिक्षण आणि कोचिंगसाठी प्रवेश प्रक्रियेबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करतात.

१५) SWAYAM (स्वयम) :— स्वयंम हा भारत सरकारने सुरू केलेला एक कार्यक्रम आहे. या प्रयत्नाचा उद्देश सर्वोत्कृष्ट शैक्षणिक शिक्षण संसाधने सर्वांपर्यंत पोहोचवणे हा आहे. जे विद्यार्थी आतापर्यंत डिजिटल क्रांती अस्पर्श राहिले आहेत आणि ज्ञान अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात सामील होऊ शकले नाहीत, त्यांच्यासाठी स्वयंम डिजिटल डिव्हाईड कमी करण्याचा प्रयत्न करतो, सर्व अभ्यासक्रम परस्परसंवादी आहेत, देशातील सर्वोत्कृष्ट शिक्षकांनी तयार केले आहेत आणि विद्यार्थ्यासाठी विनामूल्य उपलब्ध आहेत.

# महाविद्यालय समित्यांची नावे २०२५-२६

१) माहितीपत्रक विभाग प्रमुख : प्रा.डॉ.बंडू चौधरी
२) प्रार्थना विभाग प्रमुख : प्रा.डॉ. संदीपकुमार सरैया
प्रार्थना विभाग सहप्रमुख : प्रा.रा.पां.कोटांगले
३)प्रसिध्दी विभाग प्रमुख : प्रा.डॉ.बंडू चौधरी
प्रसिध्दी विभाग सहप्रमुख : प्रा. बाळकृष्ण रामटेके, प्रा.अजिंक्य भांडारकर :
४) एन.एस.एस. विभाग प्रमुख : प्रा.धनंजय गिऱ्हेपुंजे
एन.एस.एस. विभाग सहप्रमुख : प्रा.डॉ.बंडू चौधरी
: प्रा.डॉ.सौ.संगिता हाडगे
५) एन.सी.सी. विभाग प्रमुख : प्रा.बाळकृष्ण रामटेके
६) सांस्कृतिक विभाग प्रमुख : प्रा.डॉ.सौ. संगिता हाडगे
सांस्कृतिक विभाग सहप्रमुख : प्रा.डॉ.बी.एस. चौधरी
७) छात्रसंघ निवडणूक विभाग प्रमुख : प्रा. बाळकृष्ण रामटेके, प्रा.धनंजय गिऱ्हेपुंजे
८) अर्चना वार्षिकांक विभाग प्रमुख : प्रा.डॉ.बंडू चौधरी
अर्चना वार्षिकांक विभाग सहप्रमुख : प्रा. अजिंक्य भांडारकर, रूपाली खेडीकर
९) विद्यार्थी विशेष उपक्रम विभाग प्रमुख : प्रा.डॉ. सौ. सुनंदा देशपांडे
विद्यार्थी विशेष उपक्रम विभाग सहप्रमुख : प्रा.डॉ.सौ. संगिता हाडगे
१०) परीक्षा व मुल्यांकन विभाग प्रमुख : प्रा.डॉ.बंडू चौधरी
परीक्षा व मूल्यांकन विभाग सहप्रमुख : प्रा. बाळकृष्ण रामटेक
११) विद्यार्थी हजेरी समिती प्रमुख : प्रा. लालचंद मेश्राम
विद्यार्थी हजेरी समिती प्रमुख सहप्रमुख : प्रा.डॉ.सौ. संगिता हाडगे
१२) आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग प्रमुख : प्रा. लालचंद मेश्राम
१३) स्नेह मेळावा विभाग प्रमुख : प्रा.डॉ.धनंजय गभणे
१४) पालक शिक्षक संघ विभाग प्रमुख : प्रा.डॉ. सुरेश बन्सपाल
पालक शिक्षक संघ विभाग सहप्रमुख : प्रा. बाळकृष्ण रामटेके
१५) तक्रार निवारण समिती प्रमुख : प्रा.डॉ. सुरेश बन्सपाल
तक्रार निवारण समिती सहप्रमुख : प्रा.डॉ.धनंजय गभणे
१६) महाविद्यालय परिसर स्वच्छता व्यव.स. प्रमुख : प्रा.धनंजय गिऱ्हेपुंजे
महाविद्यालय परिसर स्वच्छता व्यव.स. सहप्रमुख : प्रा.डॉ. संदीपकुमार सरैया
१७) साहित्य खरेदी समिती
१.मा.प्राचार्य : प्राचार्य डॉ.दिगांबर कापसे
२.ऑफिस प्रमुख : श्री. मंगेश शिवरकर
३.कला विभाग : प्रा. लालचंद मेश्राम
४.वाणिज्य विभाग : प्रा.डॉ. सुरेश बन्सपाल
५.ग्रंथालय विभाग : प्रा.डॉ.धनंजय गभणे
१८) माजी विद्यार्थी संघप्रमुख : प्रा.डॉ.धनंजय गभणे
प्रा.माजी विद्यार्थी सहसंघप्रमुख : प्रा. बाळकृष्ण रामटेके
१९) प्रवेश समिती प्रमुख : प्रा.डॉ. सुरेश बन्सपाल
प्रवेश समिती सहप्रमुख : प्रा.डॉ.सौ. सुनंदा देशपांडे
बी.ए. भाग १ प्रमुख : प्रा. बाळकृष्ण रामटेके
बी.कॉम. १ प्रमुख : प्रा.डॉ.सौ. सुनंदा देशपांडे
बी.ए.भाग २ प्रमुख : प्रा.रामभाउऊ कोटांगले
बी.कॉम. २ प्रमुख : प्रा.डॉ. संगिता हाडगे
बी.ए. भाग ३प्रमुख : प्रा. डॉ. संदीपकुमार सरैया
बी. कॉम. ३ प्रमुख : प्रा.डॉ. सुरेश बन्सपाल
एम. ए. प्रमुख : प्रा.डॉ.बंडू चौधरी
वेळापत्रक विभाग : प्रा. लालचंद मेश्राम
२०) कला विभाग प्रमुख : प्रा. लालचंद मेश्राम
कला विभाग सहप्रमुख : प्रा. बाळकृष्ण रामटेके
२१) वाणिज्य विभाग प्रमुख : प्रा.डॉ.सौ. सुनंदा देशपांड
२२) विज्ञान विभाग प्रमुख : प्रा.डॉ. भाष्कर पर्वते
२३)य.च.मु.मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र संयोजक : प्रा.अजिंक्य भांडारकर
२४) आय.सी.टी.विभाग प्रमुख : प्रा. अजिंक्य भांडारकर
आय.सी.टी. विभाग सहप्रमुख : प्रा. रवि गुरूनानी
२५) आय.क्यु.ए.सी. विभाग प्रमुख : प्रा.डॉ.धनंजय गभणे
आय.क्यु.ए.सी.विभाग सहप्रमुख : प्रा.डॉ. सौ. सुनंदा देशपांडे
२६) महाविद्यालयीन समिती कार्यवाह : प्रा.डॉ. सुरेश बन्सपाल
२७) कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम प्रमुख : प्रा.डॉ.सौ. सुनंदा देशपांडे
२८) करिअर कट्टा व स्टूडन्ट प्लेसमेंट सेल प्रमुख : प्रा.डॉ. संदीपकुमार सरैया
२९) स्टूडन्ट प्लेसमेंट सेल सहप्रमुख : प्रा.डॉ.सौ. संगिता हाडगे
३०) राष्ट्रोत्सव प्रमुख : प्रा.धनंजय गिऱ्हेपुंजे
राष्ट्रोत्सव सहप्रमुख : प्रा. बाळकृष्ण रामटेके, प्रा.युवराज जांभुळकर
३१) दिव्यांग विद्यार्थी सुविधा समिती : प्रा.डॉ.सौ. संगिता हाडगे
३२) फलक लेखन प्रमुख : प्रा.धनंजय गिऱ्हेपुंजे
फलक लेखन सहप्रमुख : प्रा.डॉ. संदीपकुमार सरैया, प्रा. अजिंक्य भांडारकर, प्रा. युवराज जांभुळकर

सूचना: विभाग बदल करण्याचे अधिकार मा.प्राचार्यांकडे राहील.

**टिप: प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी वरील विविध प्रमुखांशी आवश्यकतेप्रमाणे संपर्क साधावा.**

# महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद सत्र:२०२५-२६

## :: पदवी विभाग ::

| क्र.नाव | हुद्दा | पात्रता | विषय | भ्रमणध्वनी |
|---|---|---|---|---|
| १) प्रा.डॉ.दि.द. कापसे | कार्यकारी प्राचार्य, इतिहास विभाग प्रमुख | एम.ए., सेट, एम.फिल., पीएच.डी. | इतिहास | ९९२१४८३०१५ |
| २) प्रा.डॉ.धं.रा. गभणे | ग्रंथपाल | एम.एस.सी., MLISC., एम.फील., पीएच.डी. | ग्रंथालय व माहितीशास्त्र, प्राणीशास्त्र | ९४२३६४०२५१ |
| ३)प्रा.ला.ना. मेश्राम | सहाय्यक प्राध्यापक — राज्यशास्त्र विभाग प्रमुख | एम.ए., बी.एड. | राज्यशास्त्र | ९७६४०८९५२७ |
| ४) प्रा.डॉ.सौ.सुनंदा देशपांडे | प्राध्यापक — वाणिज्य विभाग प्रमुख | एम.कॉम., नेट, पीएच.डी. | वाणिज्य | ९४२१७१२८३७ |
| ५) प्रा.डॉ.सु.ना. बन्सपाल | सहयोगी प्राध्यापक — वाणिज्य विभाग | एम.कॉम., एम.फिल., पीएच.डी. | वाणिज्य | ८०५५२१६४३० |
| ६) प्रा.डॉ.संगिता हाडगे | सहयोगी प्राध्यापक — वाणिज्य विभाग | एम.कॉम., एम.फिल., पीएच.डी. | वाणिज्य | ९४२०५१५२३० |
| ७) प्रा.बा.का. रामटेके | सहाय्यक प्राध्यापक — समाजशास्त्र विभाग प्रमुख | एम.ए. (समाज), नेट | समाजशास्त्र | ९९२३३४०७७२ |
| ८) प्रा.रा.पां. कोटांगले | सहाय्यक प्राध्यापक — इंग्रजी विभाग प्रमुख | एम.ए. (इंग्रजी), बी.एड., एम.फिल. | इंग्रजी | ९०७५४७७०७९ |
| ९) प्रा.धं.पां. गिन्हेपुंजे | सहयोगी प्राध्यापक व शारीरिक शिक्षण संचालक | एम.पी.एड., एम.फिल. | शारीरिक शिक्षण | ९७३०२८५०२८ |
| १०) प्रा.डॉ. सं. न. सरैया | सहाय्यक प्राध्यापक — इंग्रजी विभाग | एम.ए., बी.एड., एम.फिल. पीएच.डी. | इंग्रजी | ९८८१२५९८३१ |
| ११) प्रा.डॉ.बं.सु. चौधरी | सहाय्यक प्राध्यापक — मराठी विभाग प्रमुख | एम.ए. (मराठी), नेट, (जे.आर.एफ.) सेट, पीएच.डी. | मराठी | ९७६५१९२८७८ |

### कायम विना अनुदानीत

| क्र.नाव | हुद्दा | पात्रता | विषय | भ्रमणध्वनी |
|---|---|---|---|---|
| १२) प्रा.डॉ.भाष्कर पर्वते | सहाय्यक प्राध्यापक — विज्ञान विभाग प्रमुख | एम.एस्सी., बी.एड्., एम.फील., पीएच.डी. | प्राणीशास्त्र | ९६३७७४४४०२ |

## समर्थ महाविद्यालय, लाखनी जि.भंडारा

### माहिती अधिकार अधिनियम -२००५

**माहिती अधिकारी**

**प्रा.लालचंद मेश्राम**

**सहा.माहिती अधिकारी**

**श्री.मंगेश श्रीपत शिवरकर**

**अपिलीय अधिकारी**

**प्राचार्य डॉ.दिगांबर दत्तात्रय कापसे**

### शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद

| नं. | नाव | हुद्दा | पात्रता | भ्रमणध्वनी |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.मं.श्री. शिवरकर | मुख्य लिपीक | बी.ए. | ९४०३९५१८६१ |
| २ | श्री.प्र.दि. भांडारकर | वरिष्ठ लिपीक | बी.ए., डी.सी.एम.सी. | ९८२३६८८४६४ |
| ३ | श्री.शा.ग. पंचवटे | कनिष्ठ लिपीक | एम.एस्सी.(गणित) | ९९६००४७०२२ |
| ४ | श्री.दि.प. सलामे | कनिष्ठ लिपीक | बी.ए. | ८८०६६८१५८५ |
| ५ | श्री.वि.सु. रामटेके | ग्रंथालय परिचर | एम.ए.एम.लिब. | ९८२३८७९१०६ |
| ६ | श्रीमती मालनबाई दे. सरोते | सेविका | वर्ग ७ वा | ९८२३३४११२५ |

प्रवेश तिथी : १) प्रवेशाची अंतिम तारीख : विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार राहील.

२) मा.कुलगुरुंच्या परवानगीने वाढीव अंतिम दिनांकाची सूचना स्वतंत्रपणे फलकावर लावण्यात यईल.

# COLLEGE STAFF



# COLLEGE EVENT










# OUTSTANDING PERFORMANCE OF STUDENTS










# COLLEGE CAMPUS



























Published By : Dr.Digambar D. Kapse, Princpal, Samarth Mahavidyalaya, Lakhani, Tah.Lakhani, Dist.Bhandara
Ph. : 07186-245633, Email ID : smvlakhani@yahoo.in